RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१६० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.१९ जुलै २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## मायक्रोसॉफ्टच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड जगभरात बँकांपासून विमानसेवेपर्यंत अनेक सेवा ठप्प

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**



मायक्रोसॉफ्टच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने जगभरात बँकांपासून विमान वाहतुकीपर्यंतच्या सेवा ठप्प झाल्या आहेत. जगभरामध्ये विंडो सिस्टिमवर ब्ल्यू स्क्रिनचा एरर दिसत आहे. दरम्यान, कंपनीकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, बहुतांश विंडोड युझर्सना ब्लू स्क्रीन ऑफ डेथ एरर दिसत आहे. ही अडचण हल्लीच्या क्राऊड स्क्राइक अपडेटनंतर येत आहे. या अडचणीमुळे अनेक लोक त्रस्त आहेत.

दरम्यान, या बिघाडाचा फटका भारतातील अनेक विमान कंपन्यांना बसला आहे. मुंबई विमानतळ आणि गोवा विमातळावर सर्व्ह ठप्प झाल्याची बातमी आली आहे. तसेच मुंबई विमानतळावर चेक इन सिस्टिम ठप्प झाल्याने प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. आकासा एअरने सेवा ठप्प झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. स्पाइसजेड आणि इंडिगेकडूनही अशी तांत्रिक अडचण येत असल्याचे म्हटले आहे. सायबर सिक्युरिटी प्लॅटफॉर्म क्राऊडस्ट्राइकमध्ये निर्माण झालेल्या अडचणींमुळे सेवा बाधित झाल्याचे सांगण्यात येत आहे.

बहुतांश युझर्स याबाबत तक्रार करत आहेत. या अडचणीमुळे लाखो युझर्सना फटका बसला आहे. अनेक युझर्स त्यांच्याकडे सिस्टिम शटडाऊन झाल्याची किंवा त्यांना ब्लू स्क्रीनची अडचण येत असल्याची तक्रार करत आहे. याचा फटका मुख्य बँका, इंटरनॅशनल एअरलाइन्स, जीमेल, ॲमेझॉन आणि इतर अत्यावश्यक सेवांना फटका बसला आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर अमेरिकेबरोबरच ऑस्ट्रेलिया आणि जर्मनीमध्येही बँकिंग, टेलिकॉम, मीडिया आऊटलेट आणि एअरलाइन्सची सेवा प्रभावित झाली आहे. ऑस्ट्रेलियाच्या नॅशनल सायबर सिक्युरिटी कोऑर्डिनेटर यांनी सांगितले की, देशात शुक्रवारी दुपारी मोठ्या प्रमाणावार कंपन्यांच्या सेवा प्रभावित झाल्या आहेत.


## जगाने ५० वर्षांपूर्वीचा अनुभव घेतला विमानतळांवर हाताने लिहिले बोर्डिंग पास

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

मायक्रोसॉफ्टच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने जगभरात बँकांपासून विमान वाहतुकीपर्यंतच्या सेवा ठप्प झाल्या आहेत. अनेक देशांनी आपत्कालीन बैठक बोलावली आहे. मायक्रोसॉफ्टने यावर काम करत असल्याचे म्हटले असून काही सेवा हळू हळू पूर्ववत होत असल्याचे सांगितले आहे. तरीही अनेक ठिकाणी काम ठप्प झालेले आहे. अशातच जग मायक्रोसॉफ्टवर किती अवलंबून आहे याचा अनुभव आज सगळ्यांनी घेतला आहे.

मायक्रोसॉफ्ट येण्यापूर्वी जगातील सर्व कामे हातानेच केली जात होती. मायक्रोसॉफ्टने यात डिजिटलायझेशन सुरु केले आणि आज बहुतांश कामे ही कॉम्प्युटरवर होतात. विमानांचे परिचालनही अनेक वर्षांपूर्वी मॅन्युअलीच व्हायचे. प्रवाशांचे नाव, त्याची रजिस्टरमध्ये नोंद, विमानाच्या नोंदी आदी साऱ्या लेखी ठेवल्या जात असत. आज हायटेक जगात हैदराबाद आणि भुवनेश्वर विमानतळावर हाताने लिहून बोर्डिंग पास बनविण्यात आले.

अनेक देशांचे शेअर बाजार बंद पडले आहेत. विमानसेवा ठप्प झाल्या आहेत. लोकांना वाटले की ५० वर्षे ते मागे गेले आहेत. कंपन्यांची कामे थांबली आहेत. टीव्ही चॅनल बंद पडले आहेत. ट्रेन, मेट्रोचे संचालन ठप्प झाले आहे. अनेकांचे कॉम्प्युटर बंद




पडले आहेत. सर्व्हरमधील एका नादुरुस्तीमुळे अवघए जग ठप्प झाले आहे. मायक्रोसॉफ्ट विंडोज १० च्या ऑपरेटिंग सिस्टिममध्ये खराबी आली आहे. मायक्रोसॉफ्टच्या सेवा घेणाऱ्यांना सायबर सिक्यरिटी पुरविणाऱ्या क्राऊड स्ट्राईकच्या कामात खराबी आल्याने ही स्थिती निर्माण झाली आहे. ड्ढीवडींळड्डञ्श ही सायबर सुरक्षा फर्म आहे. हॅकर्स, सायबर हल्ले, रॅन्समवेअर आणि डेटा लीकपासून ही कंपनी सेवा घेणाऱ्या कंपन्यांचे संरक्षण करते.

बॅकएंड वर्कलोडच्या कॉन्फिगरेशनमध्ये बदल करण्यात आल्याने ही समस्या निर्माण झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. यामुळे स्टोरेज आणि कॉम्प्युटर रिसोर्सेसमध्ये व्यत्यय आला व कनेक्टिव्हिटी बंद झाली. या त्रुटीमुळे मायक्रोसॉफ्ट ३६५ सेवांवर परिणाम झाला आहे.

## परीक्षार्थ्यांची ओळख उघड न करता केंद्र, शहरनिहाय निकाल जाहीर करा

### सर्वोच्च न्यायालयाचा नॅशनल टेस्टिंग एजन्सीला आदेश



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

परीक्षार्थ्यांची ओळख उघड न करता नीट-यूजी परीक्षेचे केंद्र व शहरनिहाय निकाल येत्या शनिवारी, २० जुलै रोजी दुपारी बारा वाजेपर्यंत जाहीर करा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने नॅशनल टेस्टिंग एजन्सीला (एनटीए) गुरुवारी दिला. गैरप्रकारांमुळे नीट-यूजीच्या संपूर्ण प्रक्रियेच्या पावित्र्यालाच धक्का लागल्याचे आढळून आले; तरच ही परीक्षा पुन्हा घेण्याचे आदेश देता येतील, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने सांगितले.

नीट-यूजीची ५ मे रोजी घेण्यात आलेली परीक्षा रद्द करावी, फेरपरीक्षा घेण्यात यावी; तसेच न्यायालयाच्या देखरेखीखाली परीक्षेतील गैरप्रकारांची चौकशी व्हावी, अशा मागण्या करणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या आहेत. त्यावर न्यायालयात २२ जुलै रोजी पुन्हा युक्तिवादाला प्रारंभ होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, गैरप्रकार झाल्याचे आरोप असलेल्या केंद्रांतील परीक्षार्थींना इतर केंद्रातील परीक्षार्थींपेक्षा जास्त गुण मिळाले की नाही हे तपासायचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची ओळख उघड न करता केंद्रनिहाय निकाल जाहीर करण्याचा आदेश दिला.

## सकाळी मुंडे-दानवेंसह चौघे,संध्याकाळी महाजन-मुनगंटीवारांसह ६ जण फायरब्रँड टीम तैनात, भाजपकडून आता विरोधकांना रोज प्रत्युत्तर

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

लोकसभेच्या निवडणुकीत विरोधकांच्या प्रचाराचा फटका बसलेल्या भाजपने आता विधानसभेच्या तोंडावर सावध पावले उचलत विरोधकांना जशास तसे प्रत्युत्तर देण्याचं ठरवलं आहे. भाजपकड्न आता रोज सकाळ-संध्याकाळ विरोधकांच्या टीकेवर प्रत्युत्तर देण्यात येणार आहे. त्यासाठी दहा जणांची फायरबँड टीम तैनात करण्यात आली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंनी ही घोषणा केली आहे.



भाजपकडून रोज सकाळी ९ वाजता प्रतिक्रिया देण्यासाठी चार जणांची टीम जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये नवनिर्वाचित आमदार पंकजा मुंडे, आशिष शेलार, प्रवीण दरेकर आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचा समावेश आहे. लोकसभेच्या निवडणुकीत बसलेला फटका लक्षात घेता विधानसभेच्या निवडणुकीत भाजपने जास्तीत जास्त म्हणजे १७० ते १८० जागा लढाव्यात असा आग्रह पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी धरल्याची माहिती आहे. महाराष्ट्र प्रभारी, केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, केंद्रीय मंत्री आश्विनी वैष्णव यांच्या अध्यक्षतेखाली भाजपच्या कोअर कमिटीची बैठक मुंबईत झाली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून विधानसभेसाठी १०० जागांची मागणी भाजपकडे केली होती. मात्र शिंदे गटाची ही मागणी मान्य केली तर २०१९ पेक्षा कमी जागा भाजपला लढाव्या लागतील. त्यामुळे १७० ते १८० जागांपेक्षा कमी जागांवर भाजपने लढू नये असा आग्रह स्थानिक भाजप नेत्यांनी धरल्याची माहिती आहे. जेवढ्या जास्त जागा लढू तेवढा आधिक फायदा होईल असे मत भाजपच्या नेत्यांचे आहे. पुण्यात होणाऱ्या एक दिवसीय संमेलनाच्या आधी भाजप विधानसभेच्या किती जागा लढेल हे निश्चित होईल.

## नकली वाघांना शिवरायांच्या खऱ्या वाघ नखाचे महत्व कसे कळणार

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विरोधकांना टोला



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या वाघ नखांना नकली वाघनखे म्हणणाऱ्या नकली नेत्यांना असली वाघनखांचे महत्त्व कसे कळणार असे मत मुख्यमंत्रीएकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. त्याचवेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे नेते नकली आणि त्यांचे मंत्रीही नकली असा टोला लगावला.

सातारा येथील छत्रपती शिवाजी संग्रहालयामध्ये छत्रपती शिवरायांनी वापरलेल्या नखांसारखी वाघनखे लोकांना पाहण्यासाठी खुली करण्यात आलेली आहेत. त्याचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार, पालकमंत्री शंभूराज देसाई, खासदार उदयनराजे भोसले, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार मकरंद पाटील, आमदार जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थित पार पडले. त्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी हा टोला लगावला.

सकाळी मोठ्या उत्साहात शासकीय निवासस्थान ते छत्रपती शिवाजी संग्रहालय अशी रॅली काढण्यात आली. ढोल ताशे वाद्यांच्या गजरात आणि मर्दानी खेळांच्या उत्साहात ही रॅली काढण्यात आली. त्यानंतर ज्या ठिकाणी वाघ नखे ठेवण्यात आलेली आहेत. त्या शिवाजी संग्रहालयात ती वाघनखे सर्वांना पाहण्यासाठी खुली करण्यात आले आहेत.

## पूजा खेडकरची फाईल महाराष्ट्रातून केंद्राकडे सरकली; कारवाईची शक्यता वाढली

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर आणि तिच्या कुटुंबाचे एकेक प्रताप समोर येऊ लागले आहेत. चमकोगिरीमुळे आधी केलेले सर्व कारनामे बाहेर पडले आहेत. त्यात मनोरमा खेडकरांना अटक झाली आहे. वडील दिलीप यांच्याविरोधात एसीबीने करोडोंची बेहिशेबी संपत्ती कशी जमविली याची चौकशी सुरु केली आहे. एकंदरीतच खेडकर कुटुंबावर सरकारी हातोडा पडणार आहे. याचवेळी पूजा खेडकर प्रकरणी मोठी अपडेट आली आहे.



महाराष्ट्राचे अतिरिक्त मुख्य सचिव नितीन गराडे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने एक आठवडा तपास करून पूजा खेडकर यांची फाईल दिल्लीत पाठविली आहे. केंद्रीय कार्मिक आणि प्रशिक्षण विभागासोबतच केंद्र सरकारने स्थापन केलेल्या एक सदस्यीय समितीकडे हा अहवाल पाठविण्यात आला आहे. या समितीचा पुढील पंधरा दिवसात अहवाल अपेक्षित आहे. यानंतर खेडकर दोषी आढळल्या तर त्यांच्यावर नोकरीतून काढून टाकण्याची कारवाई होऊ शकते.

महाराष्ट्र सरकारने महसूल, आरोग्य, पोलीस आदी विविध विभागांकडून केलेल्या चौकशीतून जी कागदपत्रे सापडली, जे काही निष्पन्न झाले ते या फाईलमध्ये जोडले आहे. याचबरोबर तथ्य लपवणे आणि खोटी माहिती दिल्याबद्दल व वागणुकीवरून फौजदारी कारवाईही होऊ शकते.

दरम्यान, पूजा खेडकर यांनी पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्यावर छळाचे आरोप केले होते. यासंबंधात तक्रारही दिली होती. यावर कारवाई करण्यासाठी खेडकर यांचे जबाब नोंदवावे लागणार आहेत.

## विधानपरिषदेत गद्दारी करणाऱ्या काँग्रेसच्या आमदारांवर दोन दिवसांत कठोर कारवाई होणार; दिल्लीत हालचालींना वेग, सूत्रांची माहिती

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

फुटलेल्या आमदारांवर कारवाई करण्यात येणार आहे. नुकत्याच झालेल्या विधानपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसची मतं फुटल्याचं दिसून आलं. आता काँग्रेसच्या (उप-सीशीा) फुटलेल्या आमदारांवर कठोर कारवाई होणार आहे. सातही आमदारांना पक्षातून निलंबित करण्याची कारवाई होण्याची शक्यता आहे. या सातही आमदारांवर दोन दिवसात कारवाई होणार आहे. येत्या दोन दिवसात मल्लिकार्जुन खर्गे आणि के सी वेणुगोपाल या संदर्भात घोषणा करणार आहे.



विधानपरिषदेत निवडणुकीत ज्या आमदारांनी पक्षाच्या विरोधात जाऊन मतदान केलं आहे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली जात होती. त्यानंतर काँग्रेस पक्षाच्या राज्य कार्यकारिणीची महत्त्वाची बैठक देखील झाली. या मागणीनंतर फुटीर आमदारांवर तातडीने कारवाई होण्याची दाट शक्यता आहे. काँग्रेसच्या या फुटीर आमदारांवर काय कारवाई करणार याची माहिती येत्या दोन दिवसांमध्ये पुढे येणार आहे. चंद्रकांत हांडोरे यांच्या निवडणुकीत मत फुटल्यानंतर या निवडणुकीत काँग्रेसने सावध भूमिका घेतली होती. या निवडणुकीत जे आमदार फुटलेले आहेत त्यांचे पुरावे काँग्रेसकडे असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पक्षाला शिस्त लावण्यासाठी काँग्रेसचे हाय कमांड कठोर कारवाई करणार आहे.

## बेस्ट मुख्यमंत्री कोण? उद्धव ठाकरे की एकनाथ शिंदे?; बच्चू कडूंचे सूचक विधान

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमधील आरोप-प्रत्यारोप तीव्र झाल्याचे पाहायला मिळत आहेत. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरूनही राजकीय वातावरण तापताना दिसत आहे. यातच आता प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांनी बेस्ट मुख्यमंत्री कोण, याबाबत सूचक विधान केले आहे. तसेच राज्यातील अनेक मुद्द्यांवर स्पष्ट शब्दांत भाष्य केले.



पत्रकारांशी बोलताना बच्चू कडू म्हणाले की, लाडका भाऊ योजना आणली आहे. सर्वकाही धडधाकट असलेल्या तरुणांना सरकार जादा पैसे देते आणि ज्यांना हातपाय नाही त्यांची एक हजार रुपयांवर बोळवण करते हे योग्य नाही. आम्ही येत्या ९ तारखेला ऑगस्ट क्रांती दिनी विभाग आयुक्त कार्यालयावर निराधार आणि दिव्यांगाना घेऊन मोर्चा काढणार आहोत. राज्य सरकारने केवळ जातीनिहाय आणि मतदारांना खुश करण्यासाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण आणि भाऊ योजना आणली, अशी टीका बच्चू कडू यांनी केली.

अशोक चव्हाण यांच्यापासून आतापर्यंत अनेक मुख्यमंत्री पाहिले. अनेकांची कामे पाहिली. आतापर्यंतचा सर्वांत बेस्ट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे वाटल्याचे सांगितले. उद्धव ठाकरे यांच्याबद्दल विचारले असता ते म्हणाले की, उद्धव ठाकरे पक्ष प्रमुख म्हणून ठीक आहेत. मुख्यमंत्री म्हणून नाहीत, असे बच्चू कडू यांनी म्हटले आहे.

सांध्य दैनिक **विदर्भ प्रजासत्ताक** https://epaper.vidarbhaprajasattak.com शुक्रवार दि. १९ जुलै २०२४


## संपादकीय ......


# जागतिक पटलावर महाराष्ट्र

भारताची आर्थिक राजधानी म्हणून मुंबईला ओळखले जाते. पायाभूत सुविधांचे जाळे, दळणवळणासाठी उत्तम पर्याय, भरपूर वीज व पाणीपुरवठा, बंदर, विमानतळ, उत्तम शाळा, हॉटेल, चित्रपटगृहे, इस्पितळे आदी सुविधा मुंबईत उपलब्ध आहेत. पोर्तुगीज, डच आणि ब्रिटिशांनी या शहराचे महत्त्व ओळखले होते. मुंबई ही संमिश्र संस्कृतीची आणि आधुनिक आहे. विविध धर्मांचे, जातींचे आणि पंथांचे लोक मुंबईत राहतात. मुंबईतील सर्वसमावेशक संस्कृतीचे अस्सल दर्शन लोकलमधून प्रवास करताना घडते. दंगली, बॉम्बस्फोट, महापूर, अतिवृष्टी, अपघात अशा कोणत्याही संकटाच्या वेळी मुंबईकर एकमेकांसाठी धावून जातात. मुंबईमध्ये वित्तीय सेवा, आयटी, चित्रपट, प्रसारमाध्यमे वगैरे क्षेत्रे उत्तमपणे विकसित झाली आहेत. १९ व्या शतकापासून मुंबईत उद्योगधंदे स्थापन झाले होऊन ते भरभराटीस आले आहेत. मुंबईतील तरुण पिढी उच्चशिक्षित असून, ती विचारानेही आधुनिक आहे. महाराष्ट्रातील काही शहरे बर्यापैकी समृद्ध असतील; परंतु त्यापैकी काही परंपरावादी आहेत. बाहेरच्या लोकांना मुंबई सहजपणे सामावून घेते आणि त्यांचे गुणही आत्मसात करते. 'यह मुंबई है मुंबई...ये शहर हर एक को अपना लेता हैं और उसका सपना पुरा करता हैं' असे संवाद हिंदी चित्रपटांतून ऐकायला मिळतात, ते उगाच नाही! आज मुंबईत वरळी, लोअर परेल, बीकेसी म्हणजेच वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, अंधेरी, गोरेगाव, मालाड अशा अनेक भागांत शेअर ब्रोकिंग, विमा, गुंतवणूक सेवा, तसेच आयटी क्षेत्रातील असंख्य कंपन्या आणि स्टार्टअप्स उदयाला आले आहेत. मुंबई आता दक्षिणपूर्व आशियातील एक महत्त्वाचे आर्थिक केंद्र बनू शकते हे लक्षात घेऊन, ८ वर्षांपूर्वी मुंबईत 'मेक इन इंडिया'चा मोठा इव्हेंट आयोजित केला होता; मात्र आता केवळ मुंबईच नव्हे, तर महाराष्ट्राला येत्या काही वर्षांत जागतिक दर्जाचे आर्थिक केंद्र बनवले जाईल. जागतिक पातळीचे पर्यटन केंद्र म्हणूनही या राज्याचा विकास केला जाईल, असे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले आहे. थोडक्यात, मुंबईची दळणवळण व्यवस्था मजबूत व्हावी आणि प्रवास सुकर व्हावा, यासाठी एकनाथ शिंदे सरकार वेगाने कामाला लागले आहे. आजवर नरीमन पॉईंटहून बोरिवली वा ठाण्यापर्यंत बस अथवा कारने प्रवास करायचा झाल्यास खूप वेळ लागत होता. आता सागरी महामार्ग, अटल सेतू, फ्री वे, वरळी सी लिंक, किनारी मार्ग अशा प्रकल्पांमुळे टप्प्याटप्प्याने शहरांतर्गत प्रवास वेगवान होऊ लागला आहे. सध्या बोरिवलीवरून ठाण्याला जाण्यासाठी दीड ते दोन तास लागतात; पण ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा पूर्ण झाल्यास केवळ १२ मिनिटांत हे अंतर पार करता येणार आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना २०१८ मध्ये मुंबईच्या कोणत्याही कोपर्यातून कुठेही केवळ तासाभरात पोहोचता यावे, यादृष्टीने पायाभूत सुविधा प्रकल्प राबवण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. म्हणूनच मेट्रो, सागरी मार्ग, सागरी सेतू, बोगदे प्रकल्प या प्रकारे वाटचाल सुरूही केली. मुंबईच्या प्रगतीसाठी या प्रकल्पांचा लक्षणीय फायदा होणार आहे.

चार वर्षांपूर्वी मुंबईतील बीकेसीमध्ये होऊ घातलेले आंतरराष्ट्रीय आर्थिक सेवा केंद्र गुजरातमधील गांधीनगरला हलवण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला. विविध आर्थिक सेवा आणि त्यांच्या नियामक मंडळांची मिळून होणारी संस्था, म्हणजे 'इंटरनॅशनल फिनान्शियल सर्व्हिसेस सेंटर' (आयएफएससी) होय. या प्रकल्पात विविध सेवा एका ठिकाणाहून मिळू शकल्या असत्या. २००६ मध्ये डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना 'आयएफएससी'ची घोषणा झाली. मुंबईच्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक स्थानाचा फायदा या केंद्राला होईल, असा यामागचा हेतू होता; परंतु नंतर 'आयएफएससी' मुंबईऐवजी गुजरातच्या गांधीनगरमधील गुजरात इंटरनॅशनल फिनान्स स्टिक सिटी, म्हणजेच 'गिफ्ट सिटी'ला हलवण्यात येत असल्याचे जाहीर केले. मनमोहन सिंग सरकारने एअर इंडियाचे मुख्यालय मुंबईहून दिल्लीला हलवले. नंतर भाजपप्रणीत रालोआ सरकारने पेटंट डिझाईन आणि ट्रेडमार्क ऑफीस जे मुंबईला होते, ते दिल्लीला स्थलांतरित केले. नॅशनल मरीन पोलिस अकादमी पालघरला होणार होती, ती द्वारकेला हलवली. मुंबईच्या बंदरात होत असलेले शिप ब्रेकिंगचे काम गुजरातमधील अलंगला नेले. अनेक करोडो रुपयांचे गुंतवणुकीचे अनेक प्रकल्प जे महाराष्ट्रात होणार होते, ते गुजरात व अन्य राज्यांत गेले, अशी टीका सुरू झाली. महाराष्ट्रात या प्रश्नावरून विरोधी पक्षांनी शिंदे सरकारला धारेवर धरले. 'सध्याचे राज्य सरकार महाराष्ट्रविरोधी आहेश' असा प्रचार सुरू झाला. वास्तविक काही प्रकल्प राज्यातून बाहेर गेले हे खरे आहे; परंतु त्याचवेळी मुख्यमंत्र्यांनी दावोसमधून प्रचंड गुंतवणूक राज्यात आणली. उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रयत्नाने अनेक प्रकल्प राज्यात आले. तसेच परदेशी गुंतवणुकीत आणि एकूण औद्योगिक विकासात महाराष्ट्र देशात पुन्हा अग्रस्थानी आला; ठिकठिकाणी रस्ते, शाळा, इस्पितळे अशा सुविधा झाल्यानंतर त्या -त्या ठिकाणची अनुकूलता लक्षात घेऊन नवनवीन उद्योगधंदे स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. महाराष्ट्रात तंत्रकुशल तरुण-तरुणींची कमतरता नाही. युरोपातील काही देशांपेक्षा महाराष्ट्र हे राज्य मोठे आहे. छत्रपती शिवरायांनी उत्तुंग ध्येये बाळगली होती. मोदी यांनी अन्य राज्यांच्या नव्हे, तर थेट जगाच्या स्पर्धेत महाराष्ट्राने उतरावे आणि कर्तृत्व गाजवावे, जगभरच्या पर्यटकांना आकर्षित करून घ्यावे, अशा प्रकारचे स्वप्न समोर ठेवले आहे. महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी 'अनंत आमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा...' असा निर्धार करून, आगामी वाटचाल करावी अशी अपेक्षा आहे.




## निष्काळजीपणामुळे होतात हे पावसाळ्यातील आजार



पावसाळा हा सृष्टीच्या सृजनाचा काळ आहे. त्याचबरोबर तो अनेक आजारांना आपल्यासोबत घेऊन येणारा ऋतू म्हणूनही हल्ली ओळखला जात आहे. अर्थात, याला कारणीभूत मानवी निष्काळजीपणा आहे.या काळात आरोग्याबाबत, आहार-विहाराबाबत पथ्य न बाळगल्यास हमखास काही आजारांचा सामना करावा लागू शकतो.

**कावीळ :**पावसाळ्यामध्ये नद्यांना येणारे पूर नित्याचे असतात; पण यामुळे पाणी मोठ्या प्रमाणावर दूषित होते. असे दूषित पाणी प्यायल्याने काविळीसारख्या आजारांची लागण होते. दूषित पाण्याबरोबरच कापून ठेवलेली फळे, शिळे अन्न सेवन केल्यासही कावीळ होऊ शकते. तसेच डास, माश्या आणि काही जीवाणूंची वाढ होत असल्यास, काविळीचा फैलाव मोठ्या प्रमाणात होतो. यावर उपाय म्हणजे पाणी गाळून, उकळून, थंड करून प्यावे. तसेच फळे, भाज्या स्वच्छ धुवून मगच सेवन कराव्यात.

**अतिसार:**स्वच्छतेचा अभाव आणि दूषित पाण्याच्या सेवनामुळे अतिसार होऊ शकतो. अतिसारात मळमळ, उलट्या आणि जुलाबदेखील होऊ शकतात. आहारात दूषित मच्छीचे सेवन केल्यासही अतिसाराचा फैलाव होतो. त्यामुळे पावसाळ्यात कच्चे पदार्थ खाण्याऐवजी पूर्ण शिजवलेले अन्न सेवन करावे. स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यायला हवे.

**आर्सेनिकोसिस:**आर्सेनिक हे एक प्रकारचे रसायन आहे. ते नैसर्गिकरीत्याच पाण्यात मिसळलेले असते. दीर्घ काळ पाणी साठवून ठेवल्यास त्यात आर्सेनिकचे प्रमाण वाढते. ताज्या पाण्यात हे प्रमाण फार कमी असते. आर्सेनिक हा विषारी घटक आहे, जो मानवी शरीरासाठी हानिकारक असतो. जास्त काळ साठवलेले पाणी सतत प्यायल्यास त्वचेचा रंग बदलू लागतो. त्यामुळे मधुमेह, रक्तदाब आणि प्रजननासंबंधीचे आजार होण्याचा धोका वाढतो, असेही काही अभ्यासांमधून आढळले आहे. त्यामुळे ताजे, स्वच्छ पाणी पिण्यावर भर द्यावा.

**टॉयफॉईड :** हा आजार देखील प्रदूषित पाण्याच्या सेवनातून होतो. दूषित पाण्यातले जीवाणू आपल्या शरीरातल्या आतडे व रक्तात प्रवेश करतात. त्यामुळे हा आजार होतो. टायफॉईडमध्ये तीव्र ताप, अस्वस्थता, डोकेदुखी, बद्धकोष्ठता तसेच छातीवर लाल चट्टे निर्माण होतात. अशी लक्षणे दिसल्यास डॉक्टरची भेट घेऊन रक्ततपासणी करावी. तसेच डॉक्टरी सल्ल्याने औषधे सुरू करावीत.

**हेपटायटिस:**

प्रदूषित पाणी आणि असंतुलित आहार सेवन केल्यामुळे यकृताला सूज येते. त्यामुळे रुग्णाला भूक लागत नाही. मळमळते तसेच शारीरिक अशक्तपणा जाणवतो. तसेच खूप जास्त ताप येतो. हेपटायटिस ए व ई हे संसर्गजन्य आहेत. डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य औषधांचे सेवन या आजारात केल्यास आजार आटोक्यात येतो.

# तणनाशक फवारणी कोणत्या जमिनीत होते अधिक फायद्याची

## कोरड्या जमिनीत की ओल्या?

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**

जिल्ह्यात सध्या खरीप हंगामातील पेरण्या आटोपल्या असून पिके हवेला लागली आहेत. त्यासोबत अनावश्यक असणारे गवतदेखील वाढत असल्याने ते नष्ट करण्यासाठी शेतकरी विविध प्रकारच्या तणनाशकांची फवारणी करत आहेत.

मात्र अनेकजण चुकीच्या पद्धतीने तणनाशकाची फवारणी करत असल्याने त्याचा फायदा होताना दिसत नाही; तर जमिनीत ओलावा असताना तणनाशकाची फवारणी केल्यास ते अधिक फायदेशीर ठरत असल्याचे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

जिल्ह्यात मागच्या दोन दिवसांपासून पावसाने चांगलीच हजेरी लावली आहे. त्यामुळे जमिनीत चांगला ओलावा निर्माण झाला आहे. थोडीशी उघडीप मिळताच शेतकरी तणनाशक फवारणीकडे वळले आहेत.

कृषी केंद्रांवर विविध प्रकारची तणनाशके उपलब्ध असून ती खरेदी करण्यासाठी शेतकरी गर्दी करीत आहेत. काही शेतकरी कोरड्यावरच फवारणी करीत आहेत; तर काही शेतकरी जमिनीत ओलावा असल्यावर फवारणी करीत आहेत. ओलावा असतानाची फवारणीच अधिक फायद्याची ठरताना दिसत आहे.

गवत काढण्यासाठी मजूर मिळेना, मजुरी परवडेना

ग्रामीण भागात शेतात निंदणकामासाठी मजुरांचा फार मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला आहे. पूर्वीसारखे शेतमजूर उपलब्ध होत नसल्याने शेतकरी तणनाशक फवारणीकडे वळले आहेत.




**जमिनीत ओलावा असतानाच फवारा तणनाशक-** जमिनीत पुरेसा ओलावा असतानाच फवारणी करणे अधिक फायद्याचे असते. तण कोवळे असताना फवारल्यास तणनाशक त्यावर मारक ठरते. कोवळे तण लवकर मरते.

**तणनाशकाचे प्रकार**

**सूचीपर्णी पिकांसाठी (गहू) :** गहू, भात, ऊस, ज्वारी, आदी पिकांमध्ये २, ४-डी हे हार्मोनवर्धक तणनाशक फवारले जाते.

**चपटचा पानांच्या पिकांसाठी (कपाशी) :** कापूस पिकांतील तणनाशक फवारण्यासाठी पेंडीमेथैलिन याची फवारणी केली जाते.राउंडअप (समूळ उच्चाटन) : सर्व प्रकारच्या तणांच्या नियंत्रणासाठी जेव्हा पीक उभे नसेल तेव्हाच राउंडअप फवारणी केले जाते.

**फवारणीनंतर पिकांना पाणी द्यावे का?-** शक्यतो जमिनीत ओलावा असतानाच तणनाशकांची फवारणी करावी; कारण तणनाशक फवारणीनंतर पाणी दिल्यास तणनाशकाचा तेवढा परिणाम होणार नाही.

**तणनाशकाच्या टाकीचा अन्यत्र वापर नको**

तणनाशक फवारणी केलेली टाकी तसेच फवारणी पंप लगेच दुसऱ्या पिकांवर फवारणीसाठी उपयोगात आणू नये. तो पंप स्वच्छ, गरम पाण्याने साफ करूनच त्याचा वापर करावा.

**तणनाशकाचा पिकांवर परिणाम-** बाजारात अनेक प्रकारची तणनाशके उपलब्ध आहेत. पिकांमध्ये कोणत्या प्रकारचे तण अधिक आहे, त्यानुसार तणनाशक खरेदी करावे. चुकीचे तणनाशक फवारणी केल्यास पिकांना याचा फटका बसतो..

**जमिनीवरही विपरित परिणाम**

जमिनीची गुणवत्ता आणि प्रकार बघूनच तणनाशक फवारणी करावे. अनेकदा हलक्या जमिनीत घातक तणनाशक फवारणी केल्यास याचा पिकांच्या उत्पादनासह जमिनीच्या गुणवत्तेवर परिणाम होतो.

**फवारणी करताना घ्यावी विशेष खबरदारी**

तणनाशक फवारणी करताना जमिनीत ओलावा असावा, वातावरण चांगले असावे, स्वच्छ पाणी, स्वच्छ पंप, कीटकनाशकापासून तणनाशक दूर ठेवणे, आदी काळजी घ्यावी लागते.



# महानगरपालिका उपायुक्त माधुरी मडावी यांनी केली अंबानाला, हनुमान नगर, रामकृष्ण क्रीडा विद्यालय येथील येथील नाल्याची पाहणी

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**

**अमरावती-** महानगरपालिका उपायुक्त माधुरी मडावी यांनी गुरुवारी (ता.१८) स्वत: अंबानाला, हनुमान नगर येथील नाला, रामकृष्ण क्रीडा विद्यालय येथील नाला, सागर नगर येथील नाल्याच्या स्वच्छतेच्या कामाची पाहणी केली.

नाला परिसराची पाहणी करतांना नाल्यात जो साईडला गाळ काढून ठेवला जातो तो उचलण्याची व्यवस्था करण्यासाठी संबंधीत उपअभियंते यांना नियोजन करण्याचे निर्देश यावेळी त्यांनी दिले. अतिक्रमण विभागाने नाले साफ सफाई करत असतांना पाण्याच्या प्रवाहात गाळ येणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. नागरिकांनीही नाल्यात कचरा टाकू नये महानगरपालिका नाले साफ करते पण नागरिक त्यामध्ये गाद्या, घरातील टाकाऊ वस्तू, पूजेचे साहित्य, या सारखे अनेक प्रकारचे सामान टाकतात त्यामुळे नाल्याच्या प्रवाहात अडथळे निर्माण होवून अनेक वस्त्या पाणी जाण्याच्या दुर्घटना घडतात. नाल्याच्या परिसरात राहणा-या नागरिकांनीही सतर्क राहून कोणालाही नाल्यात कचरा फेकू देवू नये. संपुर्ण परिसरात स्वच्छता कायम राहावी व नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक बाबींची पूर्तता करावी. नागरिकांना कोणतीही असुविधा होऊ नये, याबाबत विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन महानगरपालिका उपायुक्त माधुरी मडावी यांनी संबंधित यंत्रणेला केले.

अमरावती महानगरपालिका शहर स्वच्छतेची जबाबदारी पार पाडत असतांना प्रत्येक नागरिकाने शहर अस्वच्छ होणार नाही याची खबरदारी घेणे तितकेच महत्वाचे आहे.

माझा कचरा ही माझी जबाबदारी हे लक्षात घेऊन नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी कचराच होऊ दिला नाही व कचरा टाकत असलेल्यांनाही एक स्वच्छताप्रेमी जबाबदार नागरिक म्हणून कचरा न टाकण्याचे आवाहन केले तर अमरावती देशातील सर्वोत्तम स्वच्छ शहराचे निश्चितच मानकरी ठरेल. त्यामुळे नागरिकांनी आपल्या अमरावती शहराला सक्रीय योगदान द्यावे असे आवाहन महानगरपालिका उपायुक्त माधुरी मडावी यांनी केले आहे.

या पाहणी दरम्यान अंबादेवी परिसरातील एका दुकानदाराने रोड साईड ला अतिक्रमण केले असून सदर दुकानदारावर अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही करण्यात आली.

या पाहणी दरम्यान सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, सहाय्यक आयुक्त विवेक देशमुख, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, उपअभियंता प्रमोद इंगोले, प्रभागाचे अभियंता लक्ष्मण पावडे, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, श्याम चावरे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# वीजतार चोरणाऱ्या टोळीतील तिघे गजाआड

**गुन्हे शाखेची कारवाई**

**दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक**

**दर्यापूर** - वीज तार चोरणार्या टोळीतील तिघांना गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तब्यात घेतले असून त्यांच्याकडून आणखी गुन्हे उघडकीस आणण्याबाबत चौकशी सुरू केली आहे.

दर्यापूर शहरातील साईनगरातील रहिवासी संतोष आसोले यांनी २ जुलैला येवदा पोलिस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली होती. त्यांच्या माहितीनुसार, करतखेड शिवारात प्रवीण खेडकर यांच्या शेतातील रोहित्रा अंतर्गत येणारे एकूण २५ विद्युत खांब खाली पाडून त्यावरील अल्युमिनियमची तार चोरून नेण्यात आली होती. या तारेची किंमत ४३ हजार १७५ रुपये आहे. येवदा पोलिस या घटनेचा तपास करीत असतानाच पोलिस अधीक्षकांनी स्थानिक गुन्हे शाखेला सुद्धा तपास करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार गुन्हे शाखेचे पथक तपासाला लागले असता अकोला जिल्ह्यातील मूर्तीजापूर येथील भारत श्रीकृष्ण सूर्यवंशी याने त्याच्या साथीदारांना सोबत घेऊन ही चोरी केल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.

त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाने भारत सूर्यवंशी याला अमरावतीच्या ट्रान्सपोर्ट नगरातून ताब्यात घेतले. त्याने त्याचा भाऊ लखन श्रीकृष्ण सूर्यवंशी व त्याचे साथीदार प्रकाश मारुती इंगळे रा . बोरगाव वैराळे, मोहंमद सलीम मोहंमद हमीद रा . ताजनगर चौक अमरावती व सागर नेमाडे रा . दर्यापूर यांच्या मदतीने चोरी केल्याची कबुली दिली. अमरावतीच्या मोहंमद सलीम मोहंमद हमीद याच्या भंगार दुकानात हा माल दिला असल्याचेही सांगितले. यापूर्वी दर्यापूर, खल्लार , अचलपूर परिसरामध्ये अशा प्रकारच्या चोर्या केल्याचे सांगितले व चोरीतील काही माल मुज्जू उर्फ मुजम्मील सैयद जहागीर रा . कमेला ग्राउंड अमरावती याला सुद्धा विकल्याचे सांगितले. पोलिसांनी या सर्व आरोपींपैकी श्रीकृष्ण सूर्यवंशी, प्रकाश इंगळे व मोहम्मद सलीम मो. हमीद या तिघांना अटक केली आहे.




RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# ग्रामस्थांच्या दारी जाऊन ऐकल्या समस्या!

## कोहाना या गावाला जिल्हाधिकारी यांनी भेट देऊन केला शुभारंभ!







एक दिवस मेळघाटासाठी या उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी सौरभ कट्यार यांनी धारणी तालुक्यातील अनेक गावांना भेट दिल्या तर संजीता मोहपात्रा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांनी चिखलदरा तालुक्यातील गावांना भेटी दिल्या.यावेळी सुद्धा त्यांच्या बऱ्याच समस्या निदर्शनास आलेल्या आल्या. एक दिवस मेळघाटासाठी हा एक वेगळा आणि स्तुत्य असा उपक्रम असून यामधून निश्चितच चांगल्या बाबी पुढे येतील आणि त्या बाबीच्या माध्यमातून जिल्हा प्रशासनाला मेळघाटा मधील समस्या सोडवण्यासाठी उपाय योजना करताना मोठ्या प्रमाणात मदत होईल – **सौरभ कटियार , जिल्हाधिकारी**

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक मेळघाट –** ग्रामस्थांच्या समस्या ऐकण्यासाठी विविध विभागातील अधिकाऱ्यांनी तसेच कर्मचारी यांनी प्रत्यक्ष ग्रामस्थांच्या दारी जाऊन त्यांच्या समस्या उघड्या डोळ्यांनी पाहिल्या आणि जाणून पण घेतल्या. त्यामुळे ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर समाधान पाहायला मिळाले असल्याचे दिसून आले. एक दिवस मेळघाटासाठी या अंतर्गत आज विविध विभागाचे शंभर अधिकारी आणि त्यांच्यासोबतचे कर्मचारी यांची पथके मेळघाटातील १०० गावांमध्ये रवाना झाली होती.यावेळी मेळघाटमध्ये जी पथके रवाना झाली त्यांचे अंगणवाडी सेविकांमार्फत ओवाळणी करून आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले ज्यामुळे त्यांच्या मध्ये एक वेगळी ऊर्जा संचारली होती? यावेळी चिखलदरा तालुक्यातील कोहना या गावात जिल्हाधिकारी यांच्या हस्ते उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.कैलास घोडके त्याचबरोबर जिल्हा आरोग्य अधिकारी उपस्थित होते. यावेळी गावातील विविध कामाची पाहणी करताना जिल्हाधिकारी यांनी अंगणवाडी केंद्रांना भेटी देऊन तेथील आहाराविषयी चौकशी केली. त्याचबरोबर आरोग्य तपासणी विषयी सुद्धा सखोल माहिती घेतली. तर यावेळी जिल्हाधिकारी यांनी रेशन दुकानाला भेटी देऊन त्यांची सुद्धा चौकशी केली. यावेळेस कोहना या गावातील अनेक महिला आणि पुरुष उपस्थित होते त्यांनी जिल्हाधिकारी यांच्यासमोर आपल्या समस्या मांडल्या आणि समस्या सोडवण्यासाठी विनंती केली. त्याचबरोबर मेळघाटातील शंभर गावात गेलेली पथक सुद्धा आज येथील गावात पोहोचली.त्यांनी विविध ठिकाणी त्यांना दिलेल्या फॉर्म मधील नमुनानुसार भेटी देण्यास सुरुवात केली आणि गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या आहेत यामुळे त्यांच्याकडून चांगल्या स्वरूपात अहवाल मिळून त्यांचा नंतर विभागनिहाय प्लॅन तयार करून पुन्हा फॉलोअप घेण्यासाठी पुरेसा होईल असे जिल्हाधिकारी यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# काश्मिरातील दहशतवादी हल्ल्याचा निषेध

### उबाठा शिवसेनेने केली निदर्शने




**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर–** जम्मू–काश्मीरमध्ये गेल्या काही दिवसामध्ये दहशतवादी कारवायांमध्ये वाढ झाली असून यामध्ये भारताचे अनेक जवान शहीद झाले आहे, तर अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे .या दहशतवादी हल्ल्यांचा शिवसेना उबाठा गटाने निषेध करीत दर्यापुरात शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांच्या नेतृत्वात तीव्र निदर्शने केली.

देशात एनडीएचे सरकार स्थापन होताच जम्मू–काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी पुन्हा डोके वर काढले असून गेल्या एक महिन्यात भारतीय लष्करच नव्हे तर यात्रेकरूंना त्यांनी लक्ष्य करीत हल्ले सुरू केले आहेत. या हल्ल्यांमध्ये अनेक भारतीय जवान शहीद झाले असून यात्रेकरूंना देखील आपला जीव गमवावा लागला आहे. या दहशतवादी कारवायांचा निषेध करण्यासाठी दर्यापुरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांच्या नेतृत्वात तीव्र निदर्शने करण्यात आले. यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी दहशतवादी हल्ल्यांचा निषेध करीत घोषणाबाजी केली. केंद्र सरकारने योग्य त्या उपाययोजना करून दहशतवाद्यांना चोख प्रतिउत्तर देत त्यांच्या कारवाया मोडून काढाव्या आणि दहशतवाद्यांचा नायनाट करून देशाचे नंदनवन असलेल्या जम्मू काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित करावी अशी मागणी सुनील खराटे यांनी केली.

या निदर्शने आंदोलनामध्ये दर्यापूर तालुकाप्रमुख सुनील डिके, अंजनगाव सुर्जी तालुका प्रमुख कपिल देशमुख, सहकार सेना तालुका प्रमुख गणेश लाजुरकर, तालुका समन्वयक सतीश काळे, शहरप्रमुख प्रमोद टेवरे, सहकार सेना उपतालुकाप्रमुख विनोद वडतकर यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# दुचाकीचे संतुलन बिघडल्याने दुभाजकाला भिडली, पती पत्नी जखमी

### हॉटेल आस्वाद नजीकची घटना



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव पेठ–** तिवसा तालुक्यातील गवाड गव्हाण येथील दाम्पत्य अमरावती येथे नातेवाईकांकडे जात असतांना अचानक दुचाकीचे संतुलन बिघडल्याने दुचाकी दुभाजकावर आढळून झालेल्या अपघातात पती पत्नी गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवारी सकाळी ९ वाजताच्या दरम्यान राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल आस्वाद नजीक घडली. प्रहार कार्यकर्त्यांनी तातडीने केलेल्या मदतीमुळे जखमींचे प्राण वाचले. गवाड गव्हाण येथील गजानन चौधरी (५१) व सविता चौधरी (४५) हे दाम्पत्य सकाळी गावावरून दुचाकी क्र. एम.एच.३१,सी.झेड ४७२२ ने अमरावती येथे नातेवाईकांकडे जात असतांना हॉटेल आस्वाद जवळ दुचाकीचे संतुलन बिघडल्याने दुचाकी दुभाजकावर आदळली यामध्ये दाम्पत्य गंभीर जखमी झाले. महिलेच्या डोक्याला गंभीर इजा झाल्याने रक्तस्त्राव सुद्धा खूप झाला दरम्यान प्रहारचे रुग्णसेवक अभिजित बानासुरे आणि त्यांचे सहकारी यांनी लगेच त्यांना उचलून तातडीने रुग्ण वाहिकेद्वारे जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी रवाना केले. प्रहार कार्यकर्त्यांनी वेळीच दाखविलेल्या तत्परतेमुळे दोन्ही जखमींचे प्राण वाचले.दोन्ही जखमींना खासगी रुग्णालयात हलविण्यात आल्याची माहिती आहे.

# फिटनेस, कागदपत्र चेकींग नंतरच सीटी बस ऑन रोड

## सिटी बस बंद मुळे ऑटो चालकांची मनमानी वाढली



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** रविवार १४ जुलै रोजी बसस्थानक परिसरात भरधावसिटीबसने चिरडल्याने एका ९ वर्षाचा मुलाचा मृत्यू झाल्यानंतर शहरातील भंगार सिटीबसच्या फिटनेसची तपासणी करण्याची जाग पोलिस प्रशासनाला आली. त्यामुळे सीपी रेड्डी यांनी जो पर्यंतसर्व सिटीबसची आरटीओ व्दारे फिटनेस व कागदपत्रांची तपासणी होत नाही तो पर्यंत सिटीबस रस्त्यावर धावणार नसल्याचे आदेश दिल्याने सध्याघडीला शहरातील सिटी बससेवा चार दिवसांपासून बंद आहे. आरटीओमध्ये आतापर्यंत केवळ ५ बसची फिटनेस तपासणी पूर्ण झाली. तर दुसरीकडे सिटीबस बंद असल्याने ऑटोचालकांनी प्रवाशांकडून मनमानी भाडे वसूल करायला सुरूवात केल्याने प्रवाशांचे हाल होत आहे.

महानगर पालिकेने सिटी बसचा कंत्राट महेश साहू यांना दिला आहे. महेश साहू यांनी प्रसार माध्यमांना ऑनकॅमेरा दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्याकडे २५ सिटीबस असून त्यापैकी आतापर्यंत शहरातील रस्त्यावर १८ सिटी बस धावत होत्या.प्रितमच्या मृत्यूनंतर शहरात गेल्या अनेक वर्षापासून धावणाऱ्या भंगार सिटीबसेसची तपासणी करण्याची जाग पोलिस विभागाला आली. त्यामुळे सीपी रेड्डी यांनी जोपर्यंत आरटीओमार्फतसर्व सिटीबसच्या फिटनेस व कागदपत्रांची तपासणी होत नाही तोपर्यंत एकाही सिटी बस रस्त्यावर धावणार नसल्याने फर्मान सीपींनी सोडले. त्यामुळे १५ जुलै पासून शहरातील सिटीबस सेवा ठप्प पडल्याने नागरिकांचे हाल सुरू आहे. आरटीओ कार्यालयाव्दारे आतापर्यंत केवळ ५ सिटीबसच्या फिटनेसची तपासणी झाली. उर्वरित तपासणी सुरू असून चार ते पास दिवसत उर्वरित बसेसचीतपासणी पूर्ण झाल्यानंतरच शहरातील रस्त्यांवर सिटीबस धावणार आहे. तर दुसरीकडे सिटी बस सेवा बंद असल्याने ऑटोचालक प्रवाशाकडून मनमानी पध्दतीने भाडेवाढ करित असल्याने प्रवाशांच्या खिशावर ताणा वाढला आहे.

# आक्षेपार्ह मजकुरामुळे अचलपुरात तणाव

## विशिष्ट समुदायाचा ठाण्यासमोर जमाव –अल्पवयीन मुलगा ताब्यात

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अचलपूर–** समाज माध्यमावर व्हायरल झालेल्या विशाळगडा वरील घटनेसंदर्भात इन्स्टाग्राम वर आक्षेपार्ह मजकुर टाकल्याने भावना दुखावलेल्या विशिष्ट समाजाचा शेकडोंचा जमाव अचलपूर पोलिस स्टेशनवर धडकला. अचलपूर ठाण्यात अतिरिक्त पोलिस कुमक दाखल झाली होती.विशाळगडावरील घडलेल्या घटनेच्या संदर्भात अचलपूर शहरातील एका अल्पवयीन मुलाने इन्स्टाग्रामवर पोस्ट केली. गुरूवारी दुपारी तीनच्या सुमारास विशिष्ट समाजाचा मोठा जमाव अचलपूर पोलिस स्टेशनवर धडकला . सदर पोस्टने समाजाच्या भावना दुखावल्या गेल्याचा आरोप करीत त्या अल्पवयीन युवकाला अटक करून त्याच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्याकरिता विशिष्ट समाजातील शेकडोचा संतप्त जमाव अचलपूर पोलिस स्टेशनसमोर जमला होता. कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी अतिरिक्त पोलिस दल शहरात दाखल झाले आहे . अचलपूर पोलिस स्टेशनचे ठाणेदार प्रदीप शिरस्कार व इतर पोलिस अधिकारी, कर्मचार्यांनी जमावाशी संवाद साधत जमावास शांत केले. घटनेचा पुढील तपास ठाणेदार प्रदीप शिरस्कार यांच्या मार्गदर्शनात सुरू असून अल्पवयीन युवकास चौकशीकरिता ताब्यात घेतल्याची माहिती मिळाली आहे. वृत्तलिहेपर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

### अफवांवर विश्वास ठेवू नका !

या घटनेचा पुढील तपास सुरू असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. अचलपूर शहरात शांतता आहे. तसेच शहरात शांतता, सुव्यवस्था, कायदा अबाधित ठेवण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे.

**– प्रदीप शिरस्कार ठाणेदार, अचलपूर**

# सी ६० चा टेरर; नक्षली फसले चक्रव्यूहमध्ये, आणखी दोन दलम संपले– संदीप पाटील



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक नागपूर–** माओवाद्यांशी चकमकी वेळी सुरक्षा जवानांना सुरक्षित बाहेर काढून नक्षल्यांना ठेचण्याचे अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण कौशल्य 'चक्रव्यूह' योजनेद्वारे साधले असून, गेल्या चार वर्षांपासून ते यशस्वी ठरत आहे. परिणामी, सी ६० पथकाची नक्षल्यामंध्ये दहशत असल्याचे मत नक्षलविरोधी अभियानाचे प्रमुख, विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील 'लोकमत'शी बोलताना व्यक्त केले आहे.

या मोहिमेविषयी बोलताना श्री पाटील म्हणाले, की नक्षलविरोधी अभियानाच्या या यशामुळे गडचिरोलीतील सामान्य आदिवासींमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण होत असून, गडचिरोलीत तैनात पोलिसांचे मनोबल उंचावले आहे. गेल्या चार वर्षांत जेवढ्या चकमकी झाल्यात त्यामध्ये 'चक्रव्यूह'ची योजना महत्त्वाची ठरली. नक्षलवादी कोणत्याही जागी चार तासांहून अधिक वेळ थांबत नाहीत त्यामुळे आम्हाला माहिती मिळताच आम्ही अवघ्या

दोन तासांत नक्षल्यांना घेरतो व अजिबात जीवितहानी होऊ न देता नक्षल्यांचा खात्मा केला जातो. सर्व अधिकारी, जवान यांच्या एकत्रित टीमवर्कचे हे यश आहे, असेही पाटील म्हणाले.

**संधी, वेळ अन् नियोजन हे 'चक्रव्यूह'चे यश**

नक्षल्यांची खबर मिळताच त्या संधीला आव्हान म्हणून स्वीकारण्याची वृत्ती व चढाईचे नियोजन, पथकांमधील जवान अन् अधिकाऱ्यांमध्ये समन्वय हे चक्रव्यूहचे यश आहे, असे पाटील म्हणाले.अवघ्या दोन तासांत घटनास्थळ गाठल्या जाते, 'पहिल्या फळीतील जवान नक्षल्यांना हल्ला करण्याची संधीही देत नाहीत. या जवानांच्या पाठीशी दुसरी फळी 'बॅकप' म्हणून सज्ज असते.

# अंजनगाव तालुक्यात अवैध दारु विक्रीला ब्रेक कोण लावणार?

## अवैध दारु विक्रि करण्यासाठी मोठ मोठ्या गावात तरुणांची स्पर्धा

### पोलीस प्रशासन गप्प का ? नागरिकांचा सवाल

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अंजनगाव सुर्जी–**तालुक्यात अवैध व्यवसाय जोरात सुरु असुन यात अवैध दारु विक्रीच्या व्यवसायाने बुलेट ट्रेन पेक्षाही जास्त जोर पकडला असल्याचे दिसुन येत असतांना यावर पोलीस प्रशासन गप्प का असा प्रश्न नागरिकांच्या मनात निर्माण होत आहे.अंजनगाव सुर्जी तालूक्यात दोन पोलीस स्टेशन रहिमापुर ,व अंजनगाव असुन दर्यापुर येथील राज्य ऊत्पादन शुल्क कार्यालय आणि,स्थानिक गुन्हे शाखा, अशी भली मोठी प्रशासन व्यवस्था अवैध व्यवसायाला आळा घालण्यासाठी आहे.तालुक्यात ४९ ग्रामपंचायती अंतर्गत १०८ लहान मोठे गावे येतात.यात कापुसतळणी,सातेगाव, भंडारज, चौसाळा , हीरापुर ,निमखेड, विहिगाव , पांढरी,ट ाकरखेड, निंभारी, गावंडगाव, मलक ापूर, कुंभारगाव, वनोजा, तुरेखड, लखाड सारखी मोठी गावे असून या सर्व गावात अवैध दारु विक्रीचे दोन तीन अवैध व्यवसाय करणारे आधिच असतांना आता या व्यवसायात चांगला नफा असल्याचे आणि प्रशासन कोणतीच कार्यवाही करित नसल्याचे लक्षात आल्यानंतर तालूक्यातील काही नविन तरुण युवक जे राजकारणाचा आधार घेत आता या व्यवसायात उतरली असुन यामुळे तालूक्यात अवैध दारु विक्री साठी तरुणांची चढाओढ लागल्याचे दिसुन येत असतांना आणि सातेगाव, कापुसतळणी सारख्या मोठमोठ्या गावात मोठ्याप्रमाणात रस्त्याने दारुच्या पेट्यांची वाहतूक होत असतांना पोलीस प्रशासन,राज्य उत्पादन शुल्क विभाग,स्थानीक गुन्हे शाखा विभाग गप्प का असा प्रश्न नागरिक विचारत असुन यामुळे तालुक्यातील सामाजीक वातावरण दुषीत होत असल्याचे चित्र निर्माण होत आहे.

### तरुण मुलांची झटपट पैसा कमावण्याची स्पर्धा

एका दिवसाला अवैध दारू पुरवठा करणारा दिवसा काठी पन्नास पेटी दारू चिल्लर विक्री करणाऱ्या गावोगावी पुरवितो प्रत्येक पेटी मागे पाचशे रुपये अवैध पुरवठा धारकाला मिळत असल्याचे एका अवैध देशी दारू पुरवठा करणाऱ्या व्यक्तीने सांगितले, या माहितीनुसार प्रती दिवस पंचवीस हजार मिळत असुन महिन्यांकाठी सात लाख पन्नास हजार रुपये पुरवठा धारकाला मिळत असल्याने या व्यवसायात अनेक तरुण मुलांची हा अवैध व्यवसाय करण्याची स्पर्धा लागली आहे.–

# मोहरम दिनी अंजनगावात हिंदू–मुस्लिम ऐक्य



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अंजनगाव सुर्जी**

मोहरम हा सण नसून शोक व्यक्त करण्याचा दिवस आहे.तर या दिवशी सुर्जी परिसरातील मौलाजी देवाचा ओटा संस्थान येथे हिंदू–मुस्लिम धर्मियांचे ऐक्य प्रामुख्याने पाहायला मिळते.तर या संस्थांचे विशिष्ट असे आहे की,या संस्थांनची संपूर्ण पाहणी तसेच विश्वस्त हे हिंदू धर्मिय आहेत. तत्पूर्वी मोहरम हे शिया आणि सुन्नी मुस्लिम दोघांशी संबंधित एक धार्मिक कृती आहे.स्मरणोत्सव इस्लामिक कॅलेंडरच्या पहिल्या महिन्यात मोहरममध्ये येतो.हा कार्यक्रम करबलाच्या लढाईच्या वर्धापन दिनानिमित्त आहे,जेव्हा इमाम हुसेन इब्न अली करबलाच्या लढाईत दुसऱ्या उमय्याद खलिफाने त्याच्या कुटुंबासह शहीद केले होते.तर इमाम हुसेन हे मोहम्मद पैगंबर यांचे नातू होते.अशुरा दिवस मोहरम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वार्षिक शोक दिनादरम्यान या घटनेची आठवण शिया जातीय अस्मितेची व्याख्या करते.

# इर्विनमध्ये डॉक्टर महिलेचा विनयभंग

## सहकारी डॉक्टरविरुद्ध कारवाईस प्रशासनाची टाळाटाळ

### महिला डॉक्टरची ठाण्यात धाव, डॉ. नावेद पटेलविरुद्ध गुन्हा

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** जिल्हा सामान्य रुग्णालयातील आयसीयूमध्ये रात्रपाळी ड्युटीवर असलेल्या महिला डॉक्टरचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या प्रकरणी रुग्णालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कुठलीच कारवाई न केल्याने डॉक्टर महिलेने कोतवाली ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी तक्रारीवरून डॉ. नावेद पटेल शौकत पटेल (वय ३४ रा. अंजनगाव सुर्जी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

संबंधित डॉक्टर महिला ३ जुलैला जिल्हा सामान्य रुग्णालयातील आयसीयूमध्ये रात्रपाळी ड्युटीवर होत्या. दरम्यान आपातकालीन कक्षामध्ये डॉ. नावेद हा सुध्दा रात्रपाळी ड्युटीवर होता. रात्रभर ड्युटी केल्यानंतर पहाटे ४ वाजताच्या सुमारास महिला डॉक्टर आपल्या सहकारी महिलेसोबत आयसीयूमधील एका बेडवर झोपल्या होत्या. दरम्यान नावेद आयसीयू कक्षात आला आणि




झोपलेल्या अवस्थेत महिला डॉक्टरच्या अंगावरून त्याने हात फिरविल्याने त्या खडबडून जागे झाल्या. त्यांनी डॉ. नावेदची खरडपट्टी काढली. त्यानंतर रुग्णालयातील विशाखा समिती व जिल्हा वैद्यकीय अधिक्षक यांच्याकडे तक्रारकेली. परंतु १० ते १५ दिवस झाले तरी संबंधीत अधिकाऱ्यांनी कुठलीच कारवाई न – केल्याने डॉक्टर महिलेने मंगळवारी (ता. १६ जुलै) शहर कोतवाली ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल केला. यासंदर्भात जिल्हा वैद्यकीय अधिक्षक डॉ. दिलीप सौंदळे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी बाहेरगावी असल्याचे सांगून फोन कट केला.

**प्रकरण माझ्याकडे नाहीं**

संबंधीत प्रकरण जिल्हा शल्य चिकीत्सकांकडे आहे. त्यामुळे मी काही सांगू शकणार नाही. जिल्हा शल्य चिकीत्सकच ठोस काही सांगू शकतील. **– डॉ. नरेंद्र सोळंके,** निवासी वैद्यकीय अधिकारी

# फवारणीतून विषबाधा! चोघे अत्यावस्थ, एकाचा मृत्यू

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक बुलढाणा :** शेतातील पिकावर जहाल कृषी औषधीची फवारणी सुरू असताना एकाच परिवारातील चौघे सदस्य अत्यावस्थ झाले. त्यापैकी एकाचा रुग्णालयात नेताना मृत्यू झाला तर दोन महिलांसह तिघांची प्रकृती गंभीर आहे. त्यांच्यावर बुलढाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे. जिल्ह्याच्या घाटाखालील भागातील मोताळा तालुक्यात येणाऱ्या धामणगाव बढे गावाच्या शिवारात आज गुरुवारी, घटनेचा विस्तृत तपशील मिळाला नसून प्राप्त प्राथमिक माहितीनुसार धामणगाव बढे शिवारात जाधव नामक परिवाराची शेती आहे. आज गुरुवारी दुपारी मका पिकांवर औषधी फवारणीसाठी जाधव परिवारातील चौघे सदस्य शेतात आले होते. फवारण्यात येणारे औषध अति जहाल असल्याने आणि योग्य ती दक्षता न घेतल्याने या फवारणी मुळे दोन महिलांसह चौघा सदस्यांना विषबाधा झाली. काही मिनिटातच चौघे।अत्यावस्थ झाले .याची माहिती मिळताच नातेवाईक आणि गावकरी यांनी त्यांना उपचारासाठी नेण्याची व्यवस्था केली. त्यांना उपचारासाठी नेत असताना काही अंतरावरच दामोदर जाधव ( वय ६० वर्षे) यांचा मृत्यू झाला. उर्वरित तिघांना बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी भरती करण्यात आले. मोहन देवानंद जाधव, बेबी जाधव आणि सुभद्रा जाधव अशी बाधित व्यक्तींची नावे आहेत. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे जिल्हा सामान्य रुग्णलाय सूत्रांनी सांगितले. यामध्ये दशरथ राठोड ( वय ६० वर्षे, राहणार गिरोली, तालुका मोताळा)लता अनिल वैराळकर ( वय ५० वर्षे, राहणार किन्होळा, तालुका मोताळा) आणि सीमा रवींद्र फासे (वय ३० वर्षे राहणार वरवंड तालुका बुलढाणा) अशी त्यांची नावे आहेत. त्यांना तातडीने भरती करण्यात आले आहे. शेतात काम करताना त्यांना सापाने दंश केल्याचे त्यांच्या नातेवाईकांनी सांगितले.

# स्मार्ट प्रीपेड मीटरः कंत्राट रद्द होईपर्यंत आंदोलन कायम राहणार

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक नागपूर** उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्मार्ट प्रीपेड मीटर सामान्य ग्राहकांकडे लागणार नसल्याची घोषणा केली. परंतु या मीटरचे दिलेले कंत्राट रद्द केले जात नसल्याने शंका निर्माण होते. त्यामुळे हे कंत्राट रद्द होईपर्यंत आंदोलन कायम राहिल, अशी घोषणा स्मार्ट प्रीपेड मीटरविरोधी संघर्ष समितीकडून केली गेली.

दरम्यान परवाना भवन येथे गुरूवारी (१८ जुलै) स्मार्ट प्रीपेड मीटरविरोधी संघर्ष समितीची बैठक झाली. बैठकीत समितीच्या पदाधिकाऱ्यांसह विविध संघटनांचे पदाधिकाहीही उपस्थित होते. बैठकीबाबत समितीचे संयोजक मोहन शर्मा म्हणाले,



महावितरणकडून राज्यातील ग्राहकांकडे लावण्यासाठी २ कोटीहून जास्त स्मार्ट प्रीपेड मीटर्सचे कंत्राट अदानीसह इतरही भांडवलदार कंपन्यांना दिले गेले आहे.

दरम्यान फडणवीस यांनी विधानसभेत सामान्य नागरिकांकडे हे मीटर लागणार नसल्याचे घोषीत केले. परंतु त्यानंतर हे कंत्राट रद्द केले जात नाही. त्यामुळे या मीटरचे महावितरण करणार काय? हाप्रश्नही अद्याप स्पष्ट होत नाही. तातडीने हे मीटर रद्द करण्याची मागणी शर्मा यांनी केली. स्मार्ट प्रीपेड मीटरविरोधी आंदोलन म्हणून सभा, निदर्शने, निवेदन देण्यासह विविध प्रकारचे आंदोलन यापूर्वी केले गेले. आता २० जुलैला दुपारी १ वाजता नागपुरातील कस्तूरचंद पार्क परिसरातील किंग्जवेर रुग्णालयाच्या शेजारील परवाना भवन येथील ए. बी. बर्धन ऑडीटोरीयममध्ये स्मार्ट प्रीपेड मीटर विरोधात महासम्मेलन आयोजित करण्यात आले आहे. त्यात वीजक्षेत्रातील तज्ज्ञांसह महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष प्रताप होगाडे हेही सहभागी होणार असल्याचेही शर्मा यांनी प्रसिद्धीपत्रकातून सांगितले.

# अमरावती जिल्ह्यासाठी एसटी बसेस वाढवण्याची आम. यशोमती ठाकूर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नागरिक लाल परी म्हणजेच एसटी बसने प्रवास करीत असताना जिल्ह्यातील एसटी बसेसची संख्या लक्षणीयरित्या कमी झाली आहे, त्यामुळे जिल्ह्यासाठी नवीन ४५० एसटी बसेस आणि ३२१ नवीन ई बसेस उपलब्ध करून द्याव्यात अशी आग्रही मागणी आमदार ड.यशोमती ठाकूर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.



आता केवळ ३११ बसेस सद्यस्थितीत उपलब्ध असून ११० बसेस कमी झाल्या आहेत. तसेच २०१९ मध्ये २२५० बसफेऱ्या दररोज सुरु होत्या तर २०२४ मध्ये बसेस अभावी सध्या केवळ १८३० बसफेऱ्या सुरु आहेत. ४२० बसफेऱ्या कमी झाल्या आहेत. त्यामुळे अमरावती शहरातून जाणाऱ्या दुरच्या प्रवासफेऱ्या व ग्रामीण भागात विद्यार्थी, नागरीक यांच्या प्रवास सुविधेकरिता बसेस कमी झाल्यामुळे विद्यार्थी, नागरीक यांना त्रास होत आहे. असे आमदार ड. ठाकूर यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.ही बाब लक्षात घेवून अमरावती विभागाकरिता नविन ४५० बसेस तसेच ३२१ नविन ई–बसेस मिळणेबाबतचा प्रस्ताव अमरावती जिल्हा कार्यालयाने मुंबई स्तरावर पाठविलेला आहे. या प्रस्तावाचा तातडीने विचार करून जिल्ह्यातील प्रवाशांची गैरसोय थांबविण्याकरिता त्वरित निर्णय घ्यावा अशी आग्रही मागणी ड. ठाकूर यांनी केली आहे. या वर्षात नविन बसेस ४५० तसेच ३२१ नविन ई–बसेस उपलब्ध करुन देण्याबाबत तातडीने मंजुरी मिळावी अशी विनंती ही आमदार ठाकूर यांनी केली

# आ.राणांच्या युवा स्वाभिमानी पक्षातर्फे मोफत मुरूम वाटप अभियान सुरू

## नागरिकांच्या मागणीनुसार मोफत मुरूम अभियान सुरू




**दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** पावसाळ्यात रस्त्यावर पडणारे गड्डे बुजविण्यासाठी युवा स्वाभिमान पार्टी च्या वतीने मोफत मुरूम वाटप अभियान प्रारंभ,गंगा सावित्री निवासस्थान शंकर नगर येथून आमदार रवी राणा यांनी मुरूमाच्या ट्रकांना झेंडा दाखवून रवाना केले.

सतत पडणाऱ्या पावसामुळे रस्त्यावर जागोजागी खड्डे पडतात,त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास होतो,वाहनांचे नुकसान होते,नागरिकांना मानेचे दुखणे, मनक्यांचा त्रास,आदी आजार होतात याची दखल घेवून कर्तव्यदक्ष आमदार रवी राणा यांनी मागेल त्याला मोफत मुरूम अभियान सुरू केले असून आज पासून त्याचा शुभारंभ केलाया अभियानासाठी १५ ट्रक तैनात करण्यात आले असून,युवा स्वाभिमान पार्टी चे स्वयंसेवक नागरिकांच्या मागणीनुसार अगदी मोफत त्यांच्या सांगितलेल्या जागी मुरूम पोहचावीत आहेतसेवाभावी कर्तव्यदक्ष आमदार रवी राणा यांच्या मोफत मुरूम पुरवठा अभियानामुळे नागरिकांचा पावसाळयात होणारा त्रास वाचेल,रस्त्यावरील गड्डे बुजतील कारण शहरात सध्या खड्ड्यात रस्ते आहेत की रस्त्यात खड्डे हेच ओळखू येत नाही त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी अशी अडचण आहे येथे मोफत मुरूम पोहोचवायला युवा स्वाभिमान टीम तयार आहेज्या नवीन वस्ती कॉलनी मध्ये सध्या रस्ते नाहीत अश्या ठिकाणी सुद्धा नागरिकांना आपल्या घरापर्यंत सहज सुलभतेने पोहोचता यावे यासाठी मुरूम पुरविला जाणार आहेआमदार रवी राणा यांच्या या सेवाभावी उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत केले आहे,आज ट्रक रवाना करतेवेळी आमदार रवी राणा यांच्या समवेत जयंतराव वानखडे,सचिन भेंडे,दिनेश सेठीया,अविनाश तापडिया,नितीन बोरकर,अविनाश काळे,अजय मोरया,पराग चिमोटे,रवींद्र गवई,रवी अडोकार,महेश मुल चंदानी,अनुप खडसे,सूरज मिश्रा, करण डेनवाल, समीर डोंगरे,सचिन बोंडे,बबलू गाडे,अंकुश मेश्राम,अजय बोबडे,धरम पिवाल,आनंद भोयर,शुभम उंबरकर,राहुल काळे,आदी उपस्थित होते.

# खंडव्यात नॉन ईंटरलॉकिंग; नागपूर विदर्भात धावणाऱ्या गाड्या प्रभावित

## पुनर्विकास कामांचा फटका : नागपूर–विदर्भातून धावणाऱ्या आठ गाड्या रद्द

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक नागपूर–** मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागात सुरू असलेल्या पुनर्विकास कामांचा फटका नागपूर–विदर्भातून धावणाऱ्या गाड्यांना बसला आहे. या विकास कामांमुळे ८ रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

भुसावळ विभागात भुसावळ–खंडवा रेल्वे स्थानकादरम्यान पुनर्विकासाचे काम सुरू असून त्या अंतर्गत नॉन इंटरलॉकिंग कामासाठी ब्लॉक केला जाणार आहे. त्यामुळे २२ जुलैला खालील रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.



०१३६९ बडनेरा – नरखेड़ मेमू

०१३७० नरखेड़ – बडनेरा मेमू

०१३६७ बडनेरा – नरखेड़ एक्सप्रेस

०१३६८ नरखेड़ – बडनेरा एक्सप्रेस

०१३२४ आमला – नागपूर एक्सप्रेस

०१३२३ नागपूर – आमला एक्सप्रेस

०१२०३ नागपूर – आमला एक्सप्रेस

०१२०४ आमला – नागपूर मेमू

# शिक्षण सप्ताह साजरा होणार

## २२ ते २८ जुलैला आयोजन

### शिक्षण विभागाचा नविन उपक्रम

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० च्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त दिनांक २२ ते २८ जुलै, २०२४ या कालावधीत शिक्षण सप्ताह साजरा करणेबाबत शिक्षण संचालक शरद गोरावी यांनी सर्व शिक्षणाधिकारी यांना कळविण्यात आले आहे. शिक्षण सप्ताहात आठवड्याचा प्रत्येक दिवस एका विशिष्ट उपक्रमासाठी नियोजित करण्यात आला असून, ज्यात शिक्षण व विकासाच्या विविध पैलूंचा समावेश आहे. हा शिक्षण सप्ताह विद्यार्थी, शिक्षक, धोरणकर्ते व भागधारक यांच्यामध्ये सहकार्य वाढविणारा ठरणार आहे.अमरावती जिल्हातील शाळांन मध्ये हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहीती अमरावती



जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी बुध्दभूषण सोनोने,शिक्षण विस्तार अधिकारी प्रविण खांडेकर यांनी दिली आहे.

शिक्षण सप्ताहामध्ये खालील प्रमाणे उपक्रम राबविण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये सूचित करण्यात आलेले आहे. सोमवार,दि.२२/०७/२०२४ अध्ययन अध्यापन साहित्य दिवसमंगळवार, दि. २३/०७/२०२४मुलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवसबुधवार, दि. २४/०७/२०२४क्रीडा दिवस

गुरुवार, दि. २५/०७/२०२४सांस्कृतिक दिवस ४) शुक्रवार, दि. २६/०७/२०२४ कौशल्य व डिजिटल उपक्रम दिवस शनिवार, दि. २७/०७/२०२४मिशन लाईफच्या दृष्टीक्षेपात एको क्लब उपक्रम/ शालेय पोषण दिवसरविवार, दि. २८/०७/२०२४समुदाय सहभाग दिवसया प्रमाणे शिक्षण सप्ताह हा अंगणवाडी केंद्रामध्ये देखील राबविणेबाबत सूचित केले आहे. त्याअनुषंगाने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी आपल्या जिल्ह्यातील माहिला व बालविकास विभागाशी संपर्क व समन्वय ठेऊन योजनेची अंगणवाडी केंद्रामध्ये यशस्वी रीत्या अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी. राज्यामध्ये शिक्षण सप्ताहाची यशस्वीरीत्या अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या स्तरावरून सर्व व्यवस्थापनांच्या, सर्व मंडळाच्या, सर्व माध्यमांच्या शाळांना सूचना देण्यात याव्यात.अशा आदेशशरद गोसावी शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय,पुणे यांनी दिले आहे.

# फ्रेजरपुरा येथे आम. रवि राणा यांच्या हस्ते ४५ लक्ष रुपयांच्या विकास कामांचे लोकार्पण

## विठ्ठल मंदीर परिसरातील खुल्या जागेवरील समाज मंदीराचे बांधकाम महीलांना भेटुन जाणून घेतल्या समस्या –महीलांचा उस्फुर्त प्रतिसाद

**दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** आपल्या मतदार संघातील प्रभागा प्रभातील व गावा गावातील विकास कामांना प्राधान्य देत व जनतेच्या मुलभुत सोयी सुविधा पुर्ण करण्यासाठी शासनाकडून जनतेच्या विकास कामाकरीता कोटयावधी रु. निधी खेचून आणत आपल्या मतदार संघाचा विकास आमदार रवि राणा यांनी केला. त्याच अनुषगाने फ्रेजरपुरा येथील नागरीकांच्या समस्या व गरजांना प्राधान्य देत नागरीकांच्या मागणी नुसार फ्रेजरपुरा येथील विठ्ठल मंदीराच्या परिसरातील ४५ लक्ष रु. निधीमध्ये समाज मंदीराचे बांधकाम व सौदर्यीकरण तसेच अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम करुन् दिले. याच विकास कामांचे लोकार्पन आमदार रवि राणा यांच्या हस्ते नुकतेच झाले. या प्रसंगी आमदार रवि राणा यांनी संपूर्ण फ्रेजरपुरा परिसराची पाहणी करत परिसरातील नागरीकांना विशेषत: महीलांना भेटून त्यांच्या समस्या आत्मीयतेने जाणून घेतल्या. यावेळी महीलांनी सुध्दा आमदार रवि राणा यांना उस्फुर्त प्रतिसाद देत आपल्या समस्या सांगितल्या.



यावेळी संजय गायकवाड, सुजित तायडे, दिलीप श्रीवास, राजेश सोंडे, स्वप्नील डाफे, देवेंद्र माने, महेंद्र बंदे, परेश जयस्वाल, संजय वानखडे, निखील पंचगाम, राजु पंचगाम, रवि पंचगाम, शाम मिश्रा, रमेश वलेसह शेकडो नागरीक उपस्थित होते.

# उपायुक्त माधुरी मडावी यांनी घेतला दैनंदिन साफ सफाई बाबत स्वास्थ निरीक्षकांचा आढावा बैठक

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** महानगरपालिका उपायुक्त माधुरी मडावी यांचे अध्यक्षतेखाली साफ सफाई संदर्भात सर्व प्रभाग निहाय माहिती घेण्यास्तव दिनांक १८ जुलै,२०२४ रोजी मध्य झोन क्र.२ राजापेठ येथील सभागृह येथे सर्व स्वास्थ निरीक्षकांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत प्रत्येक प्रभागातील साफ सफाई संदर्भातील, नाल्यांच्या साफ सफाई संदर्भातील तसेच दैनंदिन साफ सफाई कंत्राटाच्या कामाबाबत चर्चा करण्यात आली.१०० टक्के दैनंदिन वर्गीकृत कचरा संकलन करणे, दैनंदिन व्यावसायिक, खाजगी क्षेत्रात रात्रकालीन साफ सफाई, नेहमी कचरा दिसणाऱ्या ठिकाणाचे सौंदर्यीकरण, शेणखत उचलणे, नाल्यांची नियमित साफ सफाई करणे, प्लास्टिक बंदी मोहीम राबविणे, बांधकाम व विध्वंसक कचरा उचलणे व दंडात्मक कार्यवाही करणे महत्वाचे असल्याचे उपायुक्त माधुरी मडावी म्हणाल्या.सदर रस्त्यावर झाडांच्या फांद्या आढळून आल्यास उद्यान विभाग व स्वच्छता विभाग यांनी समन्वय साधून कार्यवाही करावी. घंटागाडी नियमितपणे घरोघरी पाठविण्याची व्यवस्था करावी. नाली साफ सफाई करावी. सर्व स्वास्थ निरीक्षकांचे संपर्क क्रमांक प्रसिध्द करण्याचे निर्देशही यावेळी त्यांनी दिले. शहरातील हॉकर्सला डस्टबिन ठेवणे अनिवार्य करावे. डस्टबिन न ठेवल्यास त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी. यावेळी संबंधीत अधिकारी व उपअभियंता यांनी समन्वय साधून कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. उपायुक्तांनी सदर कामाची संपुर्ण पाहणी केली जाईल व सदर काम गतीने पुर्ण करावे व अमरावतीकर नागरीकांना तसा दिलासा द्यावा अश्या सुचना यावेळी देण्यात आल्या.याबाबत सदर सभेमध्ये निर्देश देण्यात आले.

अमरावती शहरातील नागरिकांनी तसेच तरुण वर्गानी स्वच्छतेबाबत जागरूकता वाढवून अश्या अभियानामध्ये आपला सर्वांचा सहभाग वाढवावा व मनपा प्रशासनास सहकार्य करावे असे प्रतिपादन उपायुक्त माधुरी मडावी यांनी केले आहे.तरी वरीलप्रमाणे संबंधीतांनी विहित वेळेत कार्यवाही करुन याबाबतचा अहवाल वेळोवेळी सादर करावा.



सदर बाबतीत आपणाकडुन कोणत्याही प्रकारची हयगय आढळून आल्यास आपणाविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल. याबाबत सर्वांनी नोंद घ्यावी व सर्वांनी गांभीर्याने आपले स्तरावर जबाबदारी निहाय उपक्रम राबवावेत. प्रभागातील स्वच्छतेच्या कोणत्याही तक्रारी येता कामा नये. धुवारणी व फवारणी नियमितपणे करण्यात यावी.

यावेळी सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, विवेक देशमुख, श्रीरंग तायडे, उपअभियंता प्रमोद इंगोले, नितीन बोबडे, आशिष अवसरे, बाजार परवाना अधिक्षक उदय चव्हाण, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, उद्यान अधिक्षक श्रीकांत गिरी, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, श्याम चावरे, स्वास्थ अधिक्षक श्रीकांत डवरे, सर्व जेष्ठ स्वास्थ निरीक्षक, सर्व स्वास्थ निरीक्षक, सर्व बिटप्यून, सर्व सफाई कामगार, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# २१ जुलैला होणारी एमपीएससीची संयुक्त पूर्व परीक्षा आता २५ ऑगस्टला

## महसूल कर्मचाऱ्यांच्या 'कामबंद' चा फटका ?

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगतर्फे आयोजित महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा स्थगित करण्यात आली आहे. आता ही परीक्षा २५ ऑगस्ट २०२४ रोजी घेण्यात येणार आहे. आयोगातर्फे या बदलाचे कारण स्पष्ट करण्यात आले नाही. महसूल कर्मचायांचे राज्यव्यापी बेमुदत कामबंद आंदोलन आणि राजकीय सामाजिक स्थिती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.



यापूर्वी महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा येत्या एकवीस जुलै २०२४ रोजी घेण्यात येणार होती. त्याप्रमाणे बुलढाणा जिल्ह्यासह राज्यात या संयुक्त पूर्व परीक्षेचे नियोजन करण्यात आले. सर्व जिल्ह्यांतील परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले.अधिकारी, कर्मचारी यांच्या नेमणूक, प्रशिक्षण, पोलीस बंदोबस्त याचे नियोजन करण्यात आले. सर्व कोषागार (ट्रेझरी) कार्यालयांना परीक्षा साहित्या विषयी निर्देश देण्यात आले. राज्यातील लाखो परिक्षार्थींना २१ जुलै रोजी परीक्षा असल्याचे कळविण्यात आले. यामुळेपरीक्षेची जय्यत तयारी करण्यात आली.

आता २५ ऑगस्टला दरम्यान या तयारीच्या पार्श्वभूमीवर तारीख बदलाची सूचना देण्यात आली आहे. यामुळे २१ जुलै रोजी होणारी महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा आता २५ ऑगस्ट रोजी होणार आहे. ही परीक्षा दोन सत्रांत होणार आहे. २५ ऑगस्टला सकाळी दहा ते दुपारी बारा आणि दुपारी तीन ते संध्याकाळी पाच या कालावधीत परीक्षा पार पडणार आहे.

परीक्षा स्थगित करण्यात आल्याची आणि आता ती २५ ऑगस्टला होणार असल्याची सूचना विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्यासह संबंधित यंत्रणाना देण्यात आली आहे.

या परीक्षेच्या आयोजनाची जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्यावर असते. त्यामुळे जिल्हाधिकारी आणि अपर जिल्हाधिकारी यांनी या बदलाची माहिती पोलीस अधीक्षक, जिल्हा कोषागार अधिकारी यांना देण्यात आली आहे.

परीक्षार्थींना सरावाची संधी दरम्यान परीक्षा देणाऱ्या उमेदवारांना १ महिना चारदिवस सरावाची संधी मिळाली आहे. मात्र अत्यल्प वयोमर्यादा संपणाऱ्या उमेदवाराची अडचण होण्याची शक्यता नाकारण्यात येत नाही. यामुळे परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय काहींसाठी घातक वा अडचणीचा ठरू शकतो. ही बाब तेवढीच महत्वाची आहे.

### कामबंद कारणीभूत ?

दरम्यान परीक्षा एक महिन्याने पुढे ढकलण्यासाठी प्रामुख्याने महसूल कर्मचाऱ्यांचे राज्यव्यापी बेमुदत काम बंद आंदोलन कारणीभूत असल्याचे मानले जात आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षांची धुरा महसूल विभागावर असते.या संवर्गातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची यासाठी मोठ्या सांख्येने नेमणूक करण्यात येते. परीक्षा काटेकोर शिस्तीत घेण्यात येत असल्याने आंदोलन असताना ही परीक्षा घेणे अशक्य आहे. १५ जुलैपासून सुरू असलेल्या या आंदोलनाची शासनाने अजूनही गंभीर दखल घेतली नसल्याचे चित्र आहे.

# विवाहाचे आमिष दाखवत तीन वर्ष बलात्कार

## जाब विचारण्यासाठी घरी आलेल्या युवतीला मारहाण : मुलासह आई,बहिणीवर गुन्हा दाखल

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

एका माथेफिरू युवकाने दहावीपासून युवतीशी ओळख असल्याचा गैरफायदा घेत तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले आणि लग्नाचे आमिष देऊन सतत तीन वर्ष तिच्यावर बलात्कार केला. युवतीने लग्नाबाबत विचारले असता युवकाने नकार दिला. याबाबत युवतीने युवकाच्या आईकडे तक्रार केली असता युवकाने आई व बहीणीसोबत मिळून उलट युवतीलाच मारहाण केली. राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या परिसरात ही घटना घडली.



सागर दिपक मेश्राम, दोन महिला, सर्व रा. अमरावती अशी गुन्हे दाखल झालेल्या आरोपींची नावे आहे. माहितीनुसार, सागर व पिडीत युवती सध्या बीए व्दितीय वर्षाला शिकत आहेत. सन २०१९ ला दोघेही दहाव्या वर्गात असताना एकाच कोचिंग क्लासमध्ये सोबत शिकत असल्याने त्यांची ओळख झाली. दरम्यान सागरने तेव्हा युवतीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले आणि लग्नाचे आमिष देऊन तिच्यासोबत शारीरिक संबध प्रस्थापित केले. युवतीला विश्वास बसावा म्हणून सागरने त्याच्या व युवतीच्या घरातील सदस्यांशी चांगली ओळख निर्माण केली. दोन महिन्यापूर्वी सागरसाठी एका चांगल्या श्रीमंत मुलीचे स्थळ आल्याने त्याने युवतीसोबत दुरावा निर्माण झाला. त्यानंतर अनेकवेळा युवतीने सागरला लग्नाबाबत जाब विचारला असता त्याने कोणते ना कोणते कारण सांगून नकार दिला. परंतु, १६ जुलैला सकाळी युवतीने लग्नाचा तगादा वाढविल्यानंतर सागरने स्पष्ट नकार दिल्याने युवती सागरच्या घरी गेली आणि त्याच्या आईकडे तक्रार केली. तेव्हा सागरच्या आईने व बहीणीने तिला मारहाण करून घरातून हाकलून दिले. याबाबत कळताच सागरने देखील युवतीच्या घरी जाऊन तिला मारहाण केली. त्यामुळे युवतीने राजापेठ पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. याबाबत पोलिसांनी सागरसह दोन महिलांविरोधात गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.

# विद्युत तार अंगावर पडून शेतकऱ्याचा दुर्देवी मृत्यू

## मोर्शीच्या मेंगवाडी शेतशिवारातील घटना

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी**

शेतातील जिवंत विद्युत तार अंगावर पडल्यामुळे एका शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याचा घटना गुरुवारी दुपारी घडली. विजय निळकंठराव भोजने या ४९ वर्षीय शेतकऱ्याचा स्वतःच्या शेतातील जिवंत विद्युत तार अंगावर पडून मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी दु. १२ वाजताचे सुमारास घडली. यावेळी दोनशेच्या वर नागरिकांनी एक जूट होऊन जोपर्यंत मृतकाच्या कुटुंबीयांना महाराष्ट्र राज्य वितरणकंपनीच्या वतीने वीस लाखाची मदत व मृतकाच्या मुलाला शासकीय सेवेत सामावून घेण्यात येणार नाही तोपर्यंत मृतदेह उचलणार नाही अशी भूमिका घेतली. यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.



शेवटी मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र भुयार यांनी उपजिल्हा रुग्णालयात येऊन महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला दूरध्वनीवरून संपर्क केला. त्यांनी चार लाखाची मदत तात्काळ देण्यात येईल व उर्वरित रकमेचा प्रस्ताव शासन दरबारी पाठविण्यात येईल असे आश्वासन लेखी स्वरूपात दिले, त्यानंतर वातावरण शांत झाले.सकाळी ८ वाजताचे सुमारास माळीपुरा येथील विजय भोजने हे नेहमीप्रमाणे मौजा मेंगवाडी शेतशिवार येथील आपल्या संत्र्याच्याबगीच्यात पाहणी करत असतांना त्यांच्या शेतातून जाणारी विद्युत वाहिनीची एक तार तुटून त्यांच्या अंगावर पडली. यामुळेत्यांचाघटनास्थळीच मृत्यूझाला. बाजूच्या शेतातील रखवालदाराला विजय भोजने शेतात पडलेले दिसले असता त्याने तात्काळ भ्रमणध्वनी वरून परिवाराला माहिती दिली. त्यांचे मोठे बंधू विलास भोजने व इतर मंडळींनी घटनास्थळी धाव घेतली. विजयचा मृत्यू विद्युत तारा कोसळून झाल्याचे लक्षात आले. त्यांनी या घटनेविषयीची माहिती मोर्शी पोलिसांना व राज्य विद्युत वितरण कंपनीला दिली. मोर्शीचे ठाणेदार श्रीराम लांबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार रवी तायडे, अरुणभाऊ लांडे, सुमित पिढेकर, मंगेश श्रीराव यांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा व इतर सोपस्कार पारपाडून मृतदेह येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. मृतक विजयच्या मागे ८० वर्षाचे वृद्ध वडील, एक मोठा भाऊ, पत्नी व शाळा शिकणारा एक मुलगा व एक मुलगी असा बराच मोठा परिवार आहे. मोर्शी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून मृतकाच्या परिवाराला महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या वतीने चार लाखाची तात्काळ मदत देण्यात येण्याचे घोषित केल्यावर उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यानी शवविच्छेदन करून नातेवाईकांच्या ताब्यात मृतदेह दिला.

# अंजनगाव बारी-निंभोरा पांदन रस्ता अजूनही प्रतीक्षेत..!

## शासकीय दस्ताऐवजात रस्ता पुर्ण झाल्याची खळबळजनक प्रकार

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अंजनगाव बारी**

स्थानिक अंजनगाव बारी ग्रामीण भागात अनेक वर्षापासून प्रतीक्षेत असलेल्या अंजनगाव बारी मुख्य रस्त्यांची दुरावस्था झाली तिथे पाणंद रस्त्याचे काय असा सवाल उपस्थित होत आहे. पण शेतीसाठी चांगला रस्ता असल्यावर शेतीमाल वाहतूकीचा तसेच अत्याधुनिक यंत्रे शेतात घेऊन जाता यावीत या उद्देशाने मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेसारखी अनेक योजना राबवली जात आहे. त्याअनुशंगाने राज्य सरकारने प्रस्तावही मागवून घेतले. शिवाय रस्ते कामांना मंजुरीही मिळाली आहे. मात्र काम पूर्ण व्हायची शेवटची तिथी असूनसुद्धा प्रत्यक्षात काम अजूनही अर्धवट झाले.अंजनगाव बारी-निंभोरा रस्ता बांधकाम अनुक्रमे १८/SDE/२०२३-२०२४ मातोश्री पांदन नुसार २३ लक्ष ८५ हजार ६७७ रुपयांचे काम मंजूर करण्यात आले होते. परंतु अद्यापही 'परिस्थिति जैसे थे' असल्या कारणाने संकल्प शेतकरी संघटनेचे नितीन कदम यांनी संताप व्यक्त केला.या ठिकाणी वाळवंटी भूभाग व मातीचे ढीग आढळून येत आहे. शेतकऱ्यासोबत नितीन कदम यांनी त्याठिकाणी पाहणी केली. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागणार असल्याचे दरवर्षीप्रमाणे यावेळीही आहे. आतापर्यंत रस्त्याअभावी शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. वाहतूकीचा प्रश्न असल्याने शेतकऱ्यांची ईच्छा असून नगदी पिके घेता आली नाहीत. शिवाय यंत्र सामुग्री शेतामध्ये घेऊन जाणे शक्य झाले नाही. आता रस्ता कामाला मंजुरी मिळाल्यानंतर का होईना प्रश्न मार्गी लागेल अशी आशा शेतकऱ्यांना होती. पण प्रत्यक्षात शेत शिवारात रस्ता कामाबाबत कोणत्याच हलचाली नाहीत. पावसाळ्यापुर्वी कामे सुरु झाले नाही म्हणून यंदाच्या पावसाळ्यात शेतकऱ्यांचे हालच होणार आहेत. ज्या तत्परतेने योजनेचे नामकरण झाले त्याच तप्परतेने अंमलबजावणी व्हावी अशी अपेक्षा स्थानिक शेतकऱ्यांना होती . दरम्यान शेतमालाला दर न मिळणं ही मोठी समस्या आहेच मात्र तो माल शेतातून बाजारपेठेपर्यंत पोहोचवणे ही सुद्धा एक समस्या आहे. तसेच शेतीच्या मशागतीसाठी अत्याधुनिक यंत्रे शेतात घेऊन जाण्यातही फार मोठी समस्या उभी रहाते. पावसाळा सुरू झाला आहे. त्याआधी ही कामं पूर्ण व्हावी अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती परंतु शेतकऱ्यांच्या तोंडाला पान पुसल्याचे चित्र दिसून येत आहे. यामध्ये राजकीय हस्तक्षेपामुळे होणारी अधिकारी वर्गाची गडचेपी व कंत्राटदारची मुजोरी यामुळे मोठा गैरप्रकार सदर निर्माणकार्यात असल्याचे नाकारता येत नाही. करिता प्रत्येकाची भूमिका संशयास्पद असल्याचे शेतकाऱ्यांकडून व नागारिकांकडून बोलले जात आहे. यावेळी सदर कामाची पाहणी करायला गेले असता संकल्प शेतकरी संघटनेचे नितीन कदम यांच्यासह गजानन ठाकरे, प्रशांत दारोकार, सुनील कुऱ्हाडे, किशोर घुरे, राजेश्वर दारोकार, विकास वायकर, नंदू ढवळे,सोबतच परिसरातील शेतकरी , व संघटनेचे सदस्य,पदाधिकारी उपस्थित होते .



सदर पांदन रस्ता बांधकाम पूर्ण झाल्याची प्रशासनाची अंतिम तारीख संपली असता अद्यापही काम अर्धवटच आहे.पावसाळा सुरू झाला असतांना आता शेतकऱ्यांना दळण वळणाकरिता मोठी नरकयातना सहन करावी लागणार.तालुक्यात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार होत असतांनासुद्धा प्रशासन गप्प का ? असा प्रश्न उपस्थित होतोय. येथील कंत्राटदाराचा परवाना रद्द करावा व त्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

**नितीन कदम अध्यक्ष, संकल्प शेतकरी संघटना**

# डेंग्यू अंगावर काढाल तर जीव गमवाल; २८ जण फणफणले!

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती शहरातील डेंग्यूबाधितांची संख्या यंदाच्या साडेसहा महिन्यांत २८ वर पोहोचली आहे. त्यातील ११ डेंग्यू पॉझिटिव्ह हे गेल्या १७ दिवसांतील असून, जूनमध्येदेखील १० रुग्णांचे रक्तजल नमुने डेंग्यूबाधित निघाले होते. जानेवारी ते १७ जुलै या कालावधीत महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने एकूण ७२ संशयितांचे नमुने तपासणीस पाठविले होते. प्रभावी उपाययोजना म्हणून एसओपी तयार करण्यात आला असून, अधिकाधिक गृहभेटींवर भर दिला जात आहे. तर जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालयाने शहरातील डेंग्यूबाधितांची संख्या ३७ अशी सांगितली आहे.



पावसाळा सुरू झाल्यापासून डेंग्यूची रुग्णसंख्या वाढू लागली आहे. जुलैच्या पहिल्या १७ दिवसांत अर्जुननगर, साईनगर व अन्य परिसरात ११ डेंग्यूबाधित रुग्ण आढळून आले आहेत. यामुळे महापालिकेच्या आरोग्य विभागाने तातडीने पावले उचलत त्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत. त्या त्या भागात सर्वेक्षण सुरू करण्यात आले असून, नागरिकांची आरोग्य तपासणी केली जात आहे. डेंग्यूसदृश लक्षणे आढळणाऱ्या रुग्णांवर तातडीने उपचार केले जात आहेत.

# येत्या २४ तासांत विदर्भासह कोकण, पश्चिम किनारपट्टी क्षेत्रात पावसाचा रेड अलर्ट

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

राज्यातील अनेक भागात गेल्या ४८ तासांपासून मुसळधार ते मध्यम स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली आहे. विदर्भाकडे पाठ फिरवलेला मोसमी पाऊस पुन्हा एकदा विदर्भात दाखल झाला आहे. दरम्यान, भारतीय हवामान खात्याने येत्या २४ तासांत विदर्भासह कोकण, पश्चिम किनारपट्टी क्षेत्रात पावसाचा रेड अलर्ट दिला आहे.

मुंबई शहर आणि उपनगरासह पुणे, सातारा, कोल्हापूर ते अगदी कोकण पट्ट्यामध्ये पावसाने हजेरी लावली आहे. उत्तर बंगालच्या उपसागरावर कमी दाबाची प्रणाली असून, ही प्रणाली अंतर्गत भागांच्या दिशेने सरकताना दिसणार आहे. त्यामुळे १९ ते २१ जुलै दरम्यानच्या काळात कोकण, पश्चिम किनारपट्टीवर काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. मुंबई शहर आणि उपरनगरांसह राज्याच्या घाटमाथ्यावरील परिसरामध्ये भर दिवसा काळ्या ढगांची दाटी पाहायला मिळणार आहे. सातारा, कोल्हापूरासह कोकण आणि पुण्यातील घाटमाथ्यावर दृश्यमानतेवर याचे परिणाम होताना दिसून येतील. दरम्यान, या घाट क्षेत्रामध्ये मध्यम ते मुसळधार आणि काही ठिकाणांवर अतिमुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे.



विदर्भातील काही जिल्ह्यांना हवामान खात्याने पावसाचा रेड अलर्ट दिला असून विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. गेल्या ४८ तासांपासून विदर्भात मुसळधार ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. नागपूर जिल्ह्यातील भिवापूर तालुक्यात पुरसदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. तर चंद्रपूर जिल्ह्यात देखील रात्रीच्या सुमारास ढगफुटीसदृश्य पावसाने हजेरी लावली. वर्धा जिल्ह्यात देखील काल पेंढरी व आजूबाजूच्या परिसरात ढगफुटीसदृश्य पाऊस झाला. तर आजदेखील सकाळपासून पावसाला सुरुवात झाली आहे. नागपूर जिल्ह्यातदेखील काल सायंकाळी मध्यम स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली. तर आजही पहाटेपासून मध्यम स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली. विदर्भातच नाही तर मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह मध्यम स्वरुपातील पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कोकणात पुढील तीन दिवस अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर, रत्नागिरीला रेड अलर्टजारी करण्यात आलाय. सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, पालघरला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. राज्यातील अनेक भागात आज सकाळपासून पावसाला सुरुवात झाली आहे. असाच पाऊस सुरू राहिल्यास सखल भागांमध्ये पाणी साचण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# अमरावतीत तरुणाला आधी दुचाकीने उडवलं मग चाकूनं हल्ला करत केली हत्या

## रात्री १२:३० च्या सुमारास केडियानगर परिसरात घडली घटना



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राजापेठ पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या केडियानगरस्थित महापालिकेच्या उद्यानासमोर एका २५ वर्षीय तरुणाची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. गुरुवारी रात्री बाराच्या सुमारास ही थरारक घटना घडली. रोहित अमोल मांडळे (२५, रा. गोंडपुरा, राजापेठ) असे मृताचे नाव आहे. राजापेठ पोलिसांनी या प्रकरणी चार संशितांना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. दरम्यान राजापेठ पोलिसांनी शुक्रवारी सकाळी ७:३० च्या सुमारास केडियानगर बगीच्या समोरील जागेचा पंचनामा केला. जुन्या वादातून चार ते पाच जणांच्या तरुणांच्या जमावाने दुचाकीने रोहितला जोरदार धडक दिली. महापालिकेच्या या बगीच्याच्या प्रवेशद्वारालगत कोसळल्यानंतर अज्ञात आरोपींनी त्याला चाकूने भोसकून ठार केले.

तक्रारीनुसार रोहितच्या भावाचा वाढदिवस साजरा करण्यात येत होता. त्यासाठी रोहित सह त्याच्या भावाचे ३० ते ४० मित्र एकत्र आले होते. त्यांनी केक देखील सोबत आणला होता. दरम्यान अन्य एक मित्रासोबत बोलत असताना रोहित हा बगीच्याच्या बाहेर आला. तो फोनवर बोलत असतानाच त्याला अज्ञात टोळक्याने दुचाकीने धडक दिली. तो खाली कोसळल्यानंतर त्याचे वर चाकूने सपासप वार करण्यात आले. घटनास्थळी रोहित सह त्याच्या भावाचे मित्र असताना कोणीही मदतीसाठी धावले नाही. रात्री १२:३० च्या सुमारास रोहितला रक्तबंबाळ स्थितीत जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. दरम्यान रोहितवर देखील काही गुन्हे दाखल होते. त्यातून त्याची हत्या करण्यात आल्याची प्राथमिक शक्यता राजापेठ पोलिसांनी वर्तवली आहे.

# राज्य वनसेवेतील अधिकारी कर्मचाऱ्यांना पदके देण्याचा प्रस्ताव प्रलंबित

## वरिष्ठांचे दुर्लक्ष, चार वर्षांपासून वनकर्मचाऱ्यांना पदके दिली नाहीत



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

महाराष्ट्र वन विभागातील वनांचे संरक्षण, व्यवस्थापन व संवर्धन प्रभावीपणे होण्याकरीता क्षेत्रीय स्तरावर कार्यरत वनमजूर, वनरक्षक, वनपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी, सहाय्यक वनसंरक्षांचे मनोधैर्य वाढविणे आणि त्यांच्या उत्कृष्ठ कार्याबाबत प्रोत्साहित करण्याकरीता पुरस्कार देण्याची योजना आहे. मात्र गत चार वर्षापासून यासंदर्भातील प्रस्ताव प्रलंबित असून, आयएफएसच्या वरिष्ठांनी याकडे अक्षम्य दुर्लक्ष चालविल्याची ओरड आहे.

शासनाच्या महसूल व वनविभागाच्या ६ डिसेंबर २००० रोजीच्या निर्णयानुसार वनमजूर ते उपवनसंरक्षक पदापर्यंत अधिकारी, कर्मचारी यांना विविध कार्यप्रकारात पदके दिली जातात. परंतु गत ४ वर्षापासून ही पदके वनकर्मचाऱ्यांना दिलेली नाहीत. सद्य:स्थितीत सन २०२० ते २०२४ या चार वर्षाच्या कालावधीतील पदके प्रदान करण्यात आली नाहीत. शासन व वरिष्ठ अधिकारी विविध योजना या वन कर्मचारी व अधिकारी यांच्यामार्फत राबवितात.

परंतु दुर्गम व अवघड परिस्थितीत कार्यरत वनकर्मचाऱ्यांचे मनोधैर्य वाढविण्याकरीता फारसा प्रयत्न होताना दिसत नाही, असा वन विभागाचा कारभार सुरु आहे. मागील काही कालावधीत वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ५० कोटी वृक्षलागवडीची योजना राबविली होती. यामध्ये क्षेत्रीय अधिकारी आणि कर्मचारी यांनी महत्वाची भूमिका बजावली होती. मात्र अलीकडे वन विभागात सचिव आणि वरिष्ठ वनाधिकाऱ्यांची चलती असल्याचे दिसून येते. त्यामुळे क्षेत्रीय वनकर्मचारी किंवा महाराष्ट्र वनसेवेतील अधिकाऱ्यांच्या अडचणी सोडविण्याबाबत जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे.

सन २०१८ व २०२२ मध्ये प्राप्त कर्मचाऱ्यांना पदके प्रदान केली आहेत. आता सुद्धा पदकांसाठी प्रकरणे दाखल झाली आहेत. छाननी केली जात असून शासनाकडे पुढील निर्णयासाठी पाठविले जाणार आहे. केवळ दोनच वर्षांचे पदके देण्याचे शिल्लक आहे.

**–एन. आर. प्रवीण, सीसीएफ**

### मोक्याच्या जागेसाठी 'आयएफएस'ने निर्माण केले पदे

भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांनी (आयएफएस) संरक्षण व व्यवस्थापनाकरीता एका वनपरिक्षेत्रापेक्षाही कमी वनक्षेत्र असताना महत्वाच्या व मोठ्या शहरामध्ये राहता यावे, याकरीता विविध पदे निर्माण करून घेतली आहेत. मुंबईच्या बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व्यवस्थापना करीता २००२ च्या संवर्ग आढाव्यानुसार उपवनसंरक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याची पदस्थापना व्हायची. परंतु, आता पदामध्ये दर्जावाढ करून मुख्य वनसंरक्षक या संवर्गाचे पद करण्यात आले असून, त्यांचे अधिनस्त दोन उपसंचालकांचे पदे निर्माण केली आहेत.

# 'शिवशाही'ने १५२० रुपयांत करा आवडेल तिथे प्रवास

## एसटीची नवीन योजना: धार्मिक व ऐतिहासिक स्थळांना भेटीची संधी




**अरुण जोशी**

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

एसटी प्रशासनामार्फत आवडेल तिथे प्रवास ही योजना राबविली जाते. या योजनेंतर्गत आता शिवशाहीचासुद्धा समावेश करण्यात आला आहे. १ हजार ५२० रूपयांत चार दिवस राज्यात कुठेही प्रवास करता येणार आहे.

राज्यात दूर असलेल्या ठिकाणी जायचे असेल तर बहुतांश नागरिक आवडेल तिथे प्रवासची पास काढतात. साधी व जलद बससाठी चार दिवसांची केवळ १ हजार १७० रूपये लागतात. चार व सात दिवस असे पासचे दोन प्रकार आहेत. मात्र बहुतांश नागरिक चारच दिवसांचा पास काढतात. गडचिरोली जिल्ह्यात रेल्वेची सुविधा उपलब्ध नसल्याने बहुतांश नागरिक एसटीनेच प्रवास करण्यास प्राधान्य देतात. राज्यातील प्रत्येक ऐतिहासिक व धार्मिक स्थळापर्यंत एसटी सेवा उपलब्ध आहे.

### एसटीची आवडेल तिथे प्रवास

आवडेल तिथे प्रवास ही एसटीची अतिशय जुनी योजना आहे. या योजनेंतर्गत पास काढल्यानंतर राज्यात कुठेही प्रवास करता येते. बहुतांश प्रवाशी ही पास काढत असल्याचे दिसून येते.

**साधी–जलद :–** साध्या व जलद बससाठी केवळ १ हजार १७० रूपये शुल्क आकारल्या जाते. शिवशाहीच्या तुलनेत साध्या व जलद बसचे भाडे कमी असल्याने प्रवाशी या बसचासुद्धा पास काढत असतात.

**शिवशाही : –** शिवशाहीसाठी १ हजार ५२० रूपये चार दिवसांचे आकारले जातात. लांब प्रवासासाठी शिवशाही बस आरामदायक आहे. त्यामुळे या बसची पास काढण्यास अधिक पसंती राहत असल्याचे दिसून येते.

**सात आणि चार दिवसांचा पास :–** एसटीकडे सात व चार दिवसांचा पास उपलब्ध आहे. मात्र सात दिवसांच्या तुलनेत चार दिवसांचा पास काडण्याकडे नागरिकांचा अधिक प्रमाणात कल असल्याचे दिसून येते.

# रिचार्जचे दर वाढविल्याने सर्वसामान्यांना फटका

## सर्वच कामे ऑनलाईन : रिचार्जशिवाय पर्याय नाही



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

आधुनिक युगात मोबाइलचा वापर मोठ्या प्रमाणात वाढल्याने प्रत्येक घरात मोबाइल पोहोचलेला असून प्रत्येकाच्या हातात मोबाइल आलेला आहे. दरम्यान, आता हे संवादाचेच एक माध्यम राहिला नसून सोशल मीडिया, डिजिटल, ऑनलाइन व्यवहारासाठी अत्यंत उपयुक्त मानले गेलेले आहे. या बाबींचा फायदा घेऊन आर्थिक मंदी असताना देखील टेलिकॉम कंपन्यांनी पुन्हा रिचार्ज प्लॅनचे दर कमालीचे वाढविले आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री बसत आहे. स्मार्टफोनद्वारा मीडियाचासुद्धा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याने तरुणवर्ग दिवसभर नेटचा मोठा वापर करीत असतो. यामुळे अनेक सर्वसामान्यांचे आर्थिक नियोजन बिघडण्याचे संकेत दिसत आत्त. आजची तरुण मंडळी तर अँड्रॉइड मोबाइल फोनची अक्षरशः दिवाणी झाली आहे. कारण मोबाइलमध्ये विविध ऑनलाइन गेम, व्हॉट्सअॅप, फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर यांसारखे विविध अॅप्स असतात. या माध्यमातून तरुण दररोज बिझी राहत असतात. शिवाय लुडोसारखे मोबाइल खेळकट्टयावर खेळताना दिसत आहेत. त्यामुळे प्रत्येकाच्या हातात अँड्रॉइड मोबाइल दिसतो आहे. काही खासगी दूरसंचार मोबाइल कंपन्यांनी मोफत सिमकार्ड वाटप करून इंटरनेटसह फ्री कॉलिंगसारख्या अनेक सुविधा माफक दरात उपलब्ध करून देऊन ग्राहकांना भुरळ घातली आहे.

त्यामुळे मोबाइल कंपन्यांना अनेक ग्राहक कनेक्ट झाले. दरम्यान, मोबाइल कंपन्यांनी ग्राहक तर वाढविले; मात्र कुठे कुठे तर नेटवर्क सेवा खूपच ढासळलेली दिसत आहे. आणि आता रिचार्जचे दरही वाढवून टाकले आहेत. यामुळे मोबाइल ग्राहकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.

# दारू-गांजानंतर तरुणाईला आता लागले 'ई सिगारेट'चे वेड : प्रतिबंध असतानाही चोरट्या मार्गाने जिल्ह्यात होतो पुरवठा

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

ई–सिगारेटचे देशातील तरूणांना व्यसन जडत असल्याचे लक्षात आल्यानंतर केंद्र शासनाने फेब्रुवारी २०२२ पासून ई–सिगारेटची निर्मिती, विक्री व जाहिरात यांच्यावर बंदी घातली असली तरी चोरीच्या मार्गाने ई– सिगारेट विकली जात आहे. याला अमरावती जिल्ह्यातील तरूणाईसुद्धा बळी पडली आहे.विशेष म्हणजे शहरातील अनेक बार,पब मध्ये ही सिगारेट सहज उपलब्ध होते.गांजा, बीडी व साधी सिगारेटच्या तुलनेत ई–सिगारेट कमी धोकादायक असल्याचे सांगितले जात होते. त्यामुळे सिगारेट ओढणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढत गेली. हळुहळु ई–सिगारेटचे व्यसन जडले आहे. केंद्र शासनाने बंदी घातल्यानंतर ई–सिगारेट पूर्णपणे अवैध ठरली आहे. तरीही चोरट्या मार्गाने विक्री केली जात आहे. त्यामुळे युवकांना दाम


संग्रहित फोटो

दुप्पट किंमत मोजावी लागत आहे. दुसरीकडे सापडल्यास अटक होण्याची शक्यता आहे.

या सिगारेट चे दर्जानुसार दर आहेत. त्यामध्ये सातशे रूपयांपासून तर दहा हजार रूपयांपर्यंत सिगारेटचे दर आहेत. व्यसनाच्या आहारी गेलेले तरुण सिगारेट खरेदी करतात.

### काय आहे ई सिगारेट?

सिगारेटच्या एका पाईपमध्ये प्रोपलिन ग्लायकोल, ग्लिसरीन, फ्लेव्हरिंग्ज व निकोटीन तसेच अन्य पदार्थांचे द्रव स्वरूपात मिश्रण असते. याच पेनला एक बॅटरी बसविली असते. सदर बॅटरी उष्णता तयार करते. त्यामुळे द्रव स्वरूपातील पदार्थ वितळून त्याची वाफ तयार होते. ही वाफ घेतली जाते. सिगारेटमध्ये धूर निघतो तर ई–सिगारेटमध्ये वाफ निघते.ई–सिगारेटचा वाढता वापर व धोका लक्षात घेऊन केंद्र शासनाने उत्पादन, वाहतूक, विक्री, जाहिरात, वापर यावर फेब्रुवारी २०२२ पासून बंदी घातली आहे.

# चिखलदरा येथील स्कायवॉकचे काम साडेतीन वर्षा पासून रखडले

## खासदार बळवंत वानखडे यांनी केली कामाची पाहणी

**दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक चिखलदरा**

जगातील सर्वाधिक ४०७ मीटर लांबीचा स्कायवॉक प्रकल्प अमरावती जिल्ह्यात मेळघाटातील चिखलदरा येथे होतो आहे.. या स्कायवॉकचे ७२ टक्के काम पूर्ण झाले.. नॅशनल वाईल्ड लाईफ बोर्डने आक्षेप घेतल्यावर हे काम जुलै २०२१ पासून रखडले आहे.. चिखलदरा येथे होऊ घातलेला स्कायवॉक सध्यातरी अधांतरीच आहे..दरम्यान या कामाची पाहणी खासदार बळवंत वानखडे यांनी करत याला गती देण्यासाठी व लवकर काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले..,गुरुवारी कही कामनिमित्य खासदार बळवंत वानखड़े हे चिखलदरा ाले होते त्यावेळी त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांसोबत स्काय वॉक ची पाहणी केली.चिखलदरा येथील हरिकेन आणि गोरघाट या दोन महत्त्वाच्या पॉईंट दरम्यान स्कायवॉक राहणार आहे.. उंच पहाडावर असणाऱ्या ह्या दोन्ही पॉईंटच्या दरम्यान खोल खायीच्या वर काचेचा हा स्कायवॉक असणार आहे.. या स्कायवॉकसाठी हरिकेन आणि



गोरघाट या दोन्ही पॉईंटवर पाचशे मीटर उंच मनोरे उभारण्यात आले आहे.. जगात स्विझर्लंड आणि चीनमध्ये अशा स्वरूपाचे स्कायवॉक आहेत.. स्विझरलँड येथील स्कायवॉकची लांबी ३९७ मीटर तर चीन मधील स्कायवॉकची लांबी ३०७ मीटर आहे..

चिखलदरा येथील स्कायवॉकची लांबी सर्वाधिक ४०७ मीटर राहणार आहे..हा स्कायवॉक जगातील सर्वात लांब स्कायवॉक म्हणून गणला जाणार आहे..या प्रकल्पाला ८ फेब्रुवारी २०१९ ला सुरुवात झाली होती.. आणि हा प्रकल्प ९ फेब्रुवारी २०२१ ला पूर्ण होणार होता... वन अधिनियम १९८० आणि वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत सिडकोने सादर केलेल्या या प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्रीय वन मंत्रालयाने काही अटी आणि शर्तीसह मान्य करीत १९ जानेवारी २०१९ ला या प्रकल्पाला परवानगी दिली होती.. मात्र ज्या भागातून हा स्कायवॉक जाणार आहे.. तो भाग संरक्षित व्याघ्र प्रकल्पामध्ये येत असल्यामुळे नॅशनल वाईल्ड लाईफ बोर्डने या प्रकल्पास जुलै २०२१ मध्ये परवानगी नाकारली.. त्यामुळे गोरघाट आणि हरिकेन पॉईंट या दोन्ही ठिकाणी उभारल्या जाणाऱ्या मनोऱ्याचे काम बरेचसे रखडले आहे..आता जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखड़े या रखडलेल्या प्रकल्पाबाबत काय भूमिका घेतात या कड़े सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आषाढी पावली, जोरदार पावसाने जमीन न्हाली! शेतशिवार जलमय

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

यावर्षी खरिपाच्या सुरुवातीपासूनच पावसाने दडी मारली होती. संपूर्ण जून महिना कोरडा गेल्यानंतर जुलैमध्ये अधून–मधून तुरळक स्वरूपाचा । पाऊस आल्याने पेरणी केलेल्या शेती पिकांना काहीसा आधार मिळाला. लहरीपणाने सर्वांनाच हैराण करणारा पाऊस अखेर बुधवारी मेहरबान झाला व आकाशात गर्दी करत ढगांनी जोरदार हजेरी लावली. या पावसामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांनाही मोठा दिलासा मिळाला आहे. शेतीची उर्वरित कामेही मार्गी लागणार आहेत. शेतशिवारात चैतन्य आल्याने बळीराजाही सुखावला आहे.

अमरावती जिल्ह्यात आता सर्वत्र मुसळधार पावसाला सुरुवात झाली. आषाढी एकादशीच्या दिवशी विठूराया प्रसन्न झाल्याने तब्बल अडीच तास पावसाच्या सरींवर सरी गुरुवारी बरसल्या. पावसाची जोर'धार' असल्याने तलाव–बौडधात पाण्याचा संचय झाला, ओढे–नाले खळखळून वाहिले. रस्त्यांवरील उंच, सखल भागातही पाणी साचले. इतकेच नव्हे तर शेतशिवारही जलमय झाले आहे.